रविवार, १४ नोव्हेंबर २०२१
◆ वर्ष १४ ◆ अंक ११७
www.ramprahar.com

# राम प्रहर

◆ पाने ६ ◆ किंमत ₹ २ ◆ रायगड

## अंतरंग

भाजप मुंबईत शिवसेनेला धूळ चारणार -जेपी नड्डा/२
अर्थविषयक घडामोडींचा वेध घेणारे सदर अर्थ प्रहर/४
वर्ल्डकप : न्यूझीलंड-ऑस्ट्रेलिया यांच्यात आज अंतिम लढत/६

## गडचिरोलीत तब्बल २६ नक्षलवाद्यांचा खात्मा



**गडचिरोली** : जिल्ह्यातील ग्यारापट्टीच्या जंगलात शनिवारी (दि. १३) झालेल्या चकमकीत महाराष्ट्र पोलिसांच्या सी-६० युनिटकडून २६ नक्षलवाद्यांचा खात्मा करण्यात आला. या चकमकीत तीन जवान जखमी झाले आहेत. गडचिरोलीचे पोलीस अधीक्षक अंकित गोयल यांनी ही माहिती दिली. जखमी जवानांना उपचारासाठी तत्काळ हेलिकॉप्टरद्वारे नागपूरला हलविण्यात आले आहे. कारवाईत ठार झालेल्या नक्षलवाद्यांची ओळख अद्याप समोर आलेली नाही, मात्र यामध्ये नक्षलवाद्यांच्या मोठ्या नेत्याचादेखील समावेश असण्याची शक्यता व्यक्त होत आहे. चकमक झालेल्या ठिकाणास जवानांनी वेढा दिलेला असून जवानांकडून अद्यापही परिसरात शोधमोहीम सुरू आहे. या कारवाईत ठार झालेल्या नक्षलवाद्यांची संख्या वाढण्याचीदेखील शक्यता आहे.

# अमरावतीत कडकडीत बंद

## जमाव आक्रमक; पोलिसांचा लाठीचार्ज

**अमरावती : प्रतिनिधी**

**राज्यात शुक्रवारी ठिकठिकाणी काढण्यात आलेल्या मोर्चांमधून हिंसाचार उसळल्याच्या निषेधार्थ अमरावतीत भाजपने शनिवारी (दि. १३) बंदची हाक दिली होती. या बंदला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. या वेळी जनक्षोभ उसळून जमाव आक्रमक झाल्याचे दिसून आले. पोलिसांनी आंदोलनकर्त्यांवर लाठीचार्ज केला.**




त्रिपुरा राज्यात झालेल्या कथित अत्याचाराविरोधात अमरावतीत शुक्रवारी जिल्हाधिकारी कार्यालयावर १५ ते २० हजार लोकांनी निषेध मोर्चा काढला होता, मात्र या मोर्चाला हिंसक वळण लागले. यात अमरावती शहरातील अनेक दुकानांत तोडफोड झाली. काही दुकानदारांना मारहाणही करण्यात आली. त्यामुळे शहरात तणाव निर्माण झाला होता, तर कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्नदेखील निर्माण झाला. या मोर्चाविरोधात भाजपने अमरावती शहर बंदचे आवाहन केले होते. या आंदोलनात मोठ्या प्रमाणात तरुणांनी सहभाग घेतला.

अमरावतीत बंदच्या पार्श्वभूमीवर मोठा पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. राज्य राखीव पोलीस दलही चौकाचौकात तैनात करण्यात आले होते. तरीही आंदोलकांनी आक्रमक पवित्रा घेत आपला संताप व्यक्त केला. या वेळी पोलिसांनी आंदोलनकर्त्यांवर लाठीचार्ज केला. सध्या अमरावतीमध्ये तणावपूर्ण शांतता आहे.

**■ जमावबंदी लागू**

अमरावती शहरात कलम १४४ लागू करण्यात आले आहे. जिल्हाधिकारी पवनीत कौर यांनी जमावबंदीचे आदेश दिले आहेत, तर तीन दिवस इंटरनेट सेवा बंद करण्याचा निर्णय घेतल्याचे समजते.

## शिक्षकांनी विद्यार्थ्यांमधील गती ओळखावी -कपिल पाटील

### वसंत डावखरे स्मृती पुरस्काराचे वितरण

**ठाणे : प्रतिनिधी**



भारतरत्न सचिन तेंडुलकर, प्रसिद्ध धावपटू कविता राऊत यांची खेळातील गती शिक्षकांनी ओळखली होती. त्याच धर्तीवर शिक्षकांनी चांगला समाज घडवित असतानाच विद्यार्थ्यांमधील गती ओळखावी, असे आवाहन केंद्रीय पंचायतराज राज्यमंत्री कपिल पाटील यांनी शनिवारी (दि. १३) येथे केले.

विधान परिषदेचे माजी उपसभापती दिवंगत वसंत डावखरे यांच्या स्मृत्यर्थ भाजप शिक्षक आघाडीच्या वतीने कोकणातील आदर्श शिक्षक आणि पाच संस्थाचालकांचा पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला. त्या वेळी मंत्री पाटील बोलत होते.

या सोहळ्यास आमदार संजय केळकर, भाजप उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, स्वागताध्यक्ष आमदार निरंजन डावखरे, माजी आमदार विनय नातू, भाजपचे महापालिकेतील गटनेते मनोहर डुंबरे, प्रदेश उपाध्यक्ष माधवी नाईक, संदीप लेले, नगरसेवक कृष्णा पाटील, शिक्षण क्रांती संघटनेचे अध्यक्ष सुधीर घागस, शिक्षणाधिकारी शेषराव बढे, भाजपचे सचिन मोरे, रमेश आंब्रे, वीरसिंग पारछा आदी उपस्थित होते.

बदलत्या काळात शिक्षकांनी वेगाने बदल आत्मसात केले. अन्यथा एका पिढीचे नुकसान झाले असते. त्याबद्दल शिक्षकांचा प्रत्येक व्यक्तीने सन्मान करावा. चांगला समाज घडविण्यात शिक्षकांची भूमिका महत्त्वाची आहे. आईच्या दृष्टिकोनातूनच शिक्षकांनी विद्यार्थ्यांकडे पाहावे. मग ट्युशन-क्लासेस हद्दपार होण्यास वेळ लागणार नाही, असे मत मंत्री कपिल पाटील यांनी व्यक्त केले. शिक्षकाने पोटार्थी न राहता स्वयंप्रकाशित व्हावे, तसेच व्यापक दृष्टिकोन ठेवावा, असे आवाहनही त्यांनी केले. **(पान २ वर..)**

## महाराष्ट्रात निघालेले मोर्चे एक सुनियोजित षड्यंत्र -देवेंद्र फडणवीस

**मुंबई : प्रतिनिधी**

अमरावतीमधील संपूर्ण प्रकरणावर राज्याचे विधानसभा विरोधी पक्षनेते आणि माजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रतिक्रिया दिली आहे. महाराष्ट्रात मोर्चे निघाले, हे एक सुनियोजित षड्यंत्र वाटतेय. त्रिपुरामध्ये जी घटना घडलीच नाही, त्या घटनेवर अशा प्रकारचे मोर्चे काढणे अत्यंत चुकीचे आहे. हे थांबायला हवे. शांतता राखणे गरजेचे आहे, असे आवाहन फडणवीस यांनी केलेय.

सोशल मीडियावर चुकीचे फोटो व्हायरल करून हा सगळा प्रकार घडवण्यात आला आहे. जी मशीद जाळली होती म्हणून ही सगळी आंदोलने होत आहेत, त्या मशिदीचे फोटो त्रिपुरा सरकार आणि त्रिपुरा पोलिसांनी स्वत: जारी केले आहेत. शिवाय सोशल मीडियावर कशा प्रकारे हे खोटे फोटो टाकण्यात आले हेही प्रकाशित करण्यात आले आहे. या प्रकरणी संबंधित लोकांवर कारवाईदेखील केली आहे, असे फडणवीस म्हणाले.



**त्रिपुरातील घटनेचे पडसाद म्हणून दंगली होण्यापेक्षा दुर्दैवी संजय राऊतांनी केलेले वक्तव्य आहे. मला खूप कीव येते, वाईट वाटते. राजकारणासाठी ते किती लाचार झाले आहेत. आज स्व. बाळासाहेब ठाकरे जिवंत पाहिजे होते. त्यांनी एक थोबाडीत दिली असती.**
**-चंद्रकांत पाटील, भाजप प्रदेशाध्यक्ष**

अफवांवर विश्वास ठेवून महाराष्ट्रात मोर्चे काढायचे आणि त्यात हिंदूंची दुकाने जाळायची हे योग्य नाही. सरकारने यावर कडक कारवाई केली पाहिजे, असे सांगून फडणवीस यांनी सरकारी पक्षाचे नेते स्टेजवर जाऊन भडकवणारी भाषणे करणार असतील, तर या दंगलींची जबाबदारी सरकारवर येणार आहे, असे म्हटले.

## लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा सन्मान

### आमदार प्रशांत ठाकूर यांनी स्वीकारला पुरस्कार

कोकणात उत्तम शैक्षणिक कार्य करणाऱ्या संस्थाचालकांमध्ये जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या वतीने आमदार प्रशांत ठाकूर यांनी आणि अंजुमन-ई-इस्लाम संस्थेचे कार्यकारी चेअरमन बुरहान हॅरीस यांच्या वतीने प्रतिनिधीने पुरस्कार स्वीकारला, तर परशुराम एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष माजी आमदार विनय नातू, सॅक्रेड हार्ट स्कूलचे सेक्रेटरी अल्बिन अँथोनी, अण्णासाहेब वर्तक महाविद्यालयाचे अध्यक्ष पुष्कराज वर्तक, उत्तर महाराष्ट्र खान्देश विकास मंडळाचे कार्याध्यक्ष बापूसाहेब हाटकर यांनी उत्कृष्ट संस्थाचालकाचा पुरस्कार स्वीकारला. या वेळी कोकणातील १३० गुणवंत शिक्षकांनाही पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

## निवडक

### मणिपूरमध्ये दहशतवादी हल्ला; कर्नलसह सहा जण शहीद

**इम्फाळ** : मणिपूरच्या चुराचांदपूर जिल्ह्यात म्यानमार सीमेजवळ शनिवारी (दि. १३) सकाळी १०च्या सुमारास लष्कराच्या ताफ्यावर दहशतवादी हल्ला झाला. यात भारतीय लष्करातील कर्नल, त्यांची पत्नी व मुलाचा अंत झाला असून, अन्य तीन जवानदेखील शहीद झाले आहेत.

### खेलरत्न पुरस्कारांचे वितरण

**नवी दिल्ली** : ऑलिम्पिक सुवर्णपदकविजेता भालाफेकपटू नीरज चोप्रासह १२ खेळाडूंचा शनिवारी (दि. १३) राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांच्या हस्ते मेजर ध्यानचंद खेलरत्न पुरस्काराने सन्मान करण्यात आला.

## एसटी कर्मचाऱ्यांच्या संपाला अण्णा हजारेंचा पाठिंबा

**नगर : प्रतिनिधी**

राज्यात गेल्या १५ दिवसांपासून सुरू असलेल्या एसटी महामंडळातील कर्मचाऱ्यांच्या संपाला ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी पाठिंबा दिला आहे. आपण प्रत्यक्ष संपात सहभागी होऊ शकत नसलो, तरी कर्मचाऱ्यांच्या मागणीला आपला पाठिंबा असल्याचे अण्णांनी म्हटले.



एसटी कर्मचाऱ्यांच्या एका शिष्टमंडळाने राळेगणसिद्धी येथे जाऊन हजारे यांची भेट घेतली. त्या वेळी अण्णांनी संपातील कर्मचाऱ्यांसाठी महत्त्वाच्या सूचना केल्या. त्यानुसार, सरकारवर दबाव वाढविण्याचेही अण्णांनी सूचवले.

एसटी महामंडळाचे राज्य सरकारमध्ये विलिनीकरण करण्याच्या मागणीवरून कर्मचाऱ्यांनी पुकारलेल्या संपाचा शनिवारी (दि. १३) पंधरावा दिवस आहे. कर्मचाऱ्यांचा संप अधिक तीव्र होत आहे. आता ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनीही संपातून सरकारवर दबाव टाकण्याचे सूचवले आहे.

## काँग्रेस नेत्याकडून पंतप्रधान मोदींचे कौतुक

**बंगळुरू : वृत्तसंस्था**

काँग्रेसचे अनेक नेते पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे कौतुक करताना दिसत आहेत. पंतप्रधान मोदींचं कौतुक करणाऱ्या काँग्रेस नेत्यांमध्ये आणखी एक नाव जोडले गेलेय ते म्हणजे कर्नाटकचे माजी मंत्री आणि काँग्रेसचे ज्येष्ठ नेते प्रमोद माधवराज यांचे. प्रमोद माधवराज यांनी पद्म पुरस्कारांबाबतचा ट्रेंड बदलल्याबद्दल पंतप्रधान मोदींचे तोंडभरून कौतुक केले आहे.



काँग्रेस नेते माधवराज यांनी विश्वेश तीर्थ स्वामींना मरणोत्तर पद्मविभूषण पुरस्कार बहाल केल्याबद्दल पंतप्रधान मोदी यांचे कौतुक केले असून भारतीय जनता पक्ष केंद्रात सत्तेवर आल्यापासून पद्म पुरस्कार प्रदान करण्याच्या ट्रेंडमध्ये बदल झालाय, असे शुक्रवारी एका कार्यक्रमात भाषण देताना सांगितले. यापूर्वी अर्ज करणाऱ्यांना हा सन्मान दिला जात होता, मात्र आता मोदी सरकार सत्तेत आल्यानंतर हा ट्रेंड बदललाय. जे पात्र आहेत त्यांनाच पद्म पुरस्कार दिले जात आहेत. कुणी चांगले काम केले, तर त्याची स्तुती करायलाच हवी. मी जरी दुसऱ्या पक्षाचा (काँग्रेस) असलो, तरी पंतप्रधानांच्या चांगल्या कामाचे कौतुक मला आहे, असेही ते म्हणाले.

राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांनी सोमवारी आध्यात्मिक जगतातील अतुलनीय योगदानाबद्दल उडुपीतील पेजावर मठाचे विश्वेश्व तीर्थ स्वामी यांना मरणोत्तर पद्मविभूषण प्रदान केला. हा पुरस्कार विश्वप्रसन्ना यांनी स्वीकारला. त्यांच्या स्वागतासाठी गुरुवारी उडुपीत आयोजित कार्यक्रमादरम्यान काँग्रेस नेत्याने पद्म पुरस्काराबाबत पंतप्रधान मोदी आणि त्यांच्या सरकारचे कौतुक केले.

## माथेरानमधील रोजगाराचे प्रश्न घेऊन भाजपचे शिष्टमंडळ राजधानी दिल्लीत



**कर्जत : बातमीदार**

माथेरान शहर आणि परिसराच्या विकासासाठी महत्त्वाचे प्रश्न घेऊन माथेरानमधील भारतीय जनता पक्षाचे नगरसेवक दिल्लीत केंद्रीय मंत्र्यांच्या भेटीसाठी गेले होते. त्यांनी केंद्रीय पर्यावरण मंत्री, तसेच केंद्रीय भूपृष्ठमंत्री यांची भेट घेऊन माथेरानमधील रोजगाराचे प्रश्न प्राधान्याने सोडविण्याची मागणी केली. भाजप नेते व जिल्ह्यातील उरण विधानसभा मतदारसंघाचे आमदार महेश बालदी आणि माथेरानचे उपनगराध्यक्ष आकाश चौधरी यांच्या नेतृत्वाखाली नगरसेवक राजधानीत गेले होते.

माथेरान हे ब्रिटिश काळापासून वाहनांना बंदी असलेले पर्यटनस्थळ आहे. येथील पर्यावरण राखले जावे यासाठी केंद्रीय पर्यावरण मंत्रालयाने २००२मध्ये माथेरान इको झोनची घोषणा केली होती. त्यानंतर माथेरानवर निर्बंध येऊन येथील रोजगार हिरावले. या संदर्भात केंद्रीय पर्यावरण मंत्रालयाशी चर्चा करण्यासाठी आणि त्यातून मार्ग निघावा यासाठी भाजपचे शिष्टमंडळ दिल्ली दरबारी गेले होते.

या शिष्टमंडळात आमदार महेश बालदी, माथेरानचे उपनगराध्यक्ष आकाश चौधरी यांच्यासह भाजपचे माथेरान अध्यक्ष प्रवीण सकपाळ, तसेच किरण चौधरी, माजी नगरसेवक प्रदीप घावरे, राजेश चौधरी, युवा नेते किरण ठाकरे यांचा समावेश होता. **(पान २ वर..)**



# भाजप मुंबईत शिवसेनेला धूळ चारणार

## ■ महापालिका निवडणूक जिंकण्याचा जेपी नड्डांचा निर्धार

**मुंबई : प्रतिनिधी**

आगामी मुंबई महापालिकेच्या निवडणुकीत शिवसेनेला धूळ चारण्यात भाजप यशस्वी होईल, असा विश्वास भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जेपी नड्डा यांनी व्यक्त केला. मुंबईत मुंबई महापालिकेच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर भाजप कार्यकारिणीच्या बैठकीत सदस्यांना नड्डा यांनी मार्गदर्शन केले.




यंदा मुंबई महापालिका निवडणुकीत कुठल्याही परिस्थितीत भाजपचे कमळ खुलवायचे, असा चंग भारतीय जनता पक्षाने आणि त्यांच्या वरिष्ठ नेत्यांनी बांधला आहे. त्याच पार्श्वभूमीवर भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जेपी नड्डा यांनी मुंबईत भाजप कार्यकारिणीच्या बैठकीत सदस्यांना मार्गदर्शन करताना मुंबई महापालिका जिंकण्याचा विश्वास व्यक्त केला. आसाममधील आमदारांच्या मार्गदर्शन शिबिराच्या निमित्ताने नड्डा हे दोन दिवस मुंबई दौऱ्यावर होते. या दौऱ्यात त्यांनी आगामी मुंबई महानगरपालिका निवडणुकीच्या संदर्भात पक्षाच्या तयारीचा आढावा घेतला. तसेच राज्यातील महाविकास आघाडी सरकारवरही त्यांनी निशाणा साधला.

महाविकास आघाडी सरकार लोकशाही मार्गानेच हटवू आणि आगामी मुंबई महापालिकेच्या निवडणुकीत शिवसेनेला धूळ चारण्यात भाजप यशस्वी होईल, असा विश्वास नड्डा यांनी व्यक्त केला. भाजप येणार, मुंबई घडवणार... असा नारा देत मुंबईतील भाजपा पदाधिकारी आणि आमदारांनी या बैठकीत मार्गदर्शन केले.

विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांच्यासह प्रदेश स्तरावरील काही ज्येष्ठ नेत्यांशी आणि आमदार मंगलप्रभात लोढा व अतुल भातखळकर यांच्याशी आगामी निवडणुकांच्या तयारीविषयी संघटनात्मक बाबींवरही नड्डा यांनी चर्चा केली. त्यानंतर मुंबई भाजपच्या कार्यकारिणीची बैठक पार पडली.

दरम्यान, गतपंचवार्षिक महापालिका निवडणुकीत भाजपला ८२ जागा मिळाल्या होत्या. शिवसेनेपेक्षा केवळ दोन जागा कमी असल्याने भाजपला महापालिकेत सत्ता मिळू शकली नव्हती. त्यामुळे या निवडणुकीत पूर्ण ताकदीने प्रयत्न करण्याच्या सूचना नड्डा यांनी भाजप नेत्यांना दिल्या आहेत. तसेच ज्या प्रभागात कमी जागा मिळाल्या त्या प्रभागातील नागरिकांच्या समस्यांकडे ताकदीने लक्ष देण्याच्या सूचनाही नड्डा यांनी केल्या आहेत.

# पनवेलमध्ये हर घर दस्तक अभियान

## कोरोना लसीकरणासाठी घरोघरी जाऊन सर्वेक्षण

**पनवेल : प्रतिनिधी**

पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील नागरिकांचे कोविड लसीकरण पूर्ण करण्यासाठी 'हर घर दस्तक' अभियानास सुरूवात करण्यात आली आहे. महापौर डॉ. कविता चौतमोल, सभागृह नेते परेश ठाकूर, आयुक्त गणेश देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली पालिकेने ९ ऑक्टोबरपासून घरोघरी जाऊन सर्वेक्षण सुरू केले आहे.

पालिका क्षेत्रात मिशन कवच कुंडल अंतर्गत पहिल्या डोसचा लक्षांक पूर्ण झाला असला तरी केंद्र शासनाच्या 'हर घर दस्तक' अभियानांतर्गत कोविड लसीकरणाबाबत आरोग्य कर्मचारी पुनश्च: सर्वेक्षण करत आहेत. ज्या नागरिकांचा पहिला व दुसरा डोस राहिला आहे अशा नागरिकांची नाव नोंदणी करून त्यांचे लसीकरण पूर्ण करण्यासाठी पालिका प्रयत्न करत आहे.

ग्रामीण भागातील ज्या नागरिकांचे लसीकरण राहिले आहे अशा नागरिकांचे लसीकरण पूर्ण करण्यासाठी शोध मोहीम सुरू करण्यात आली आहे. यासाठी ग्रामीण भागात ३० लसीकरण केंद्र सुरू करण्यात आली आहे. हे अभियान चांगल्या प्रकारे राबविण्यासाठी सूक्ष्म नियोजन करण्यात आले आहे. यासाठी पहिल्या फळीतील कर्मचारी, आशा सेविका यांची मदत घेतली जात आहे. घरोघरी जाऊन लसीकरण झाले आहे की नाही याची नोंद करण्यात येत आहे.

कोविन पोर्टलच्या साह्याने ज्या लाभार्थींचा दुसरा डोस राहिला आहे अशा नागरिकांच्या घरोघरी जाऊन लसीकरणास प्रवृत्त केले जात आहे. बाजार पेठांमध्येही जनजागृती करण्यात येत आहे. प्रसारमाध्यमांच्या माध्यमातूनही जनजागृती करण्यात येत आहे.



## अनिल परबांचा एसटी कर्मचाऱ्यांना वचन देणारा जुना व्हिडीओ व्हायरल

**मुंबई : प्रतिनिधी**

एसटी कर्मचाऱ्यांच्या संपाचा पेच सुटण्याचे कोणतेही चिन्ह दिसत नाहीये. असे असताना राज्याचे परिवहनमंत्री अनिल परब यांचा एसटी कामगारांना वचन देतानाचा एक जुना व्हिडीओ सोशल माध्यमांवर व्हायरल झाला आहे.

संबंधित व्हिडिओ फेब्रुवारी २०२०मधील आहे असा दावा केला जात आहे. परब हे एसटी कर्मचाऱ्यांच्या मेळाव्यात भाषण करीत आहेत. या आमच्या महाविकास आघाडच्या कारकिर्दीमध्ये एसटी कामगारांना आपल्या मागण्यांसाठी संघर्ष करावा लागणार नाही

### भाजपकडून जोरदार टीका



एवढे मी वचन देतो, असे आश्वासन परब यांनी व्हिडीओत दिले आहे. यावरून किती खोट्या शपथा अन् वचने घेणार. थोडी फार उरली असेल तर शब्दाला जागा, अशी टीका भाजप उपाध्यक्ष चित्रा वाघ यांनी केली आहे.

# सिडको तयार करणार गावांचा विकास आराखडा

**नवी मुंबई : सिडको वृत्तसेवा**

राज्य शासनाच्या नगरविकास विभागाने खोपटा नव नगर अधिसूचित क्षेत्रासाठी ३२ गावे (रायगड जिल्ह्याच्या पनवेल तहसीलची सात गावे आणि उरण तहसीलची २५ गावे) विकसित करण्यासाठी सिडकोची विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून नेमणूक केली आहे. त्यानुसार परिपूर्ण विकास करण्यासाठी खोपटा नव नगर अधिसूचित क्षेत्रातील ३२ गावांचा विकास आराखडा तयार करण्याचा इरादा सिडकोने जाहीर केला आहे.

सिडकोने विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून खोपटा नव नगरातील सहा गावांसाठी (बारापाडा, कर्नाळा (तारा), डोलघर, साई, कासारभट, दिघाटी) विकास आराखडा तयार करून ३ एप्रिल २००८ रोजी प्रकाशित केला होता.

खोपटा नवनगर अधिसूचित क्षेत्राच्या विकासाचे उद्दिष्ट पायाभूत आणि सामाजिक सुविधा प्रदान करणे व विकासाच्या विविध क्षेत्रात संधी निर्माण करणे आहे. एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीनुसार खोपटा नव नगरतील सहा गावांच्या मंजूर विकास आराखडा तसेच उर्वरित २६ गावांचा तयार करण्यात येणारा विकास आराखडा परस्पर सुसंगत असावा यासाठी खोपटा नव नगर अधिसूचित क्षेत्रातील उर्वरित २६ गावांचा विकास आराखडा तयार करीत असतांना सहा गावांच्या मंजूर असलेल्या विकास आराखड्याची फेरतपासणी करून त्यात बदल करण्याची आवश्यकता आहे.

या संदर्भातील सूचना सिडकोतर्फे प्रसिद्ध करण्यात आली असून सूचना व नकाशाची प्रत सिडकोचे संकेतस्थळ http://cidco.maharashtra.gov.in येथे उपलब्ध करण्यात आली आहे.

या आराखड्याने निश्चितच खोपटा नव नगर अधिसूचित क्षेत्राचा उत्तम विकास होईल व हा परिसर सर्वसमावेशक व उत्तम दर्जाच्या सोयी सुविधांनी परिपूर्णरित्या विकसित झाल्यावर एक सुनियोजित शहर म्हणून नावारूपास येईल, असे सिडकोचे एमडी संजय मुखर्जी यांनी म्हटले आहे.

## वडखळ येथील गुंड रायगडातून तडीपार

**अलिबाग :** पेण तालुक्यातील वडखळ येथील बालगोविंद रामभजन चव्हाण (वय २४) व आदर्श मधुसुदन भास्कर (वय २३) या दोन गुंडांना रायगड जिल्ह्यातून तडीपार करण्यात आले आहे. दोघांनी वडखळ परिसरात भय व दहशतीचे वातावरण निर्माण केले होते. त्यामुळे वडखळ पोलीस निरीक्षकांनी या दोघांविरुद्ध कारवाईचा प्रस्ताव रायगड पोलीस अधीक्षकांकडे सादर केला होता. त्यानुसार रायगड जिल्ह्यातून एक वर्षासाठी हद्दपार करण्याचे आदेश दिले.

पान १ वरून

## शिक्षकांनी विद्यार्थ्यांमधील गती ओळखावी –कपिल पाटील

महाराष्ट्रातील एक दमदार नेतृत्व अशी दिवंगत वसंत डावखरे यांची ओळख होती. त्यांचीच परंपरा आमदार निरंजन डावखरे यांच्याकडून चालविली जात आहे, अशा शब्दांत मंत्री पाटील यांनी कौतुक केले.

महाविकास आघाडी सरकारकडून शिक्षकांकडे दुर्लक्ष केले जात आहे. अशा परिस्थितीत भाजप शिक्षक आघाडीने शिक्षकांच्या पाठीशी राहावे, असे आवाहन आमदार केळकर यांनी केले.

माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या वतीने पुरस्कार स्वीकारताना आमदार प्रशांत ठाकूर म्हणाले की, वसंत डावखरे यांनी संपर्कात आलेल्या प्रत्येक व्यक्तीच्या आयुष्यात वसंत फुलविला होता. आता वसंतस्मृती पुरस्काराच्या माध्यमातून डावखरे साहेबांची स्मृती कायम राहील.

माजी आमदार विनय नातू यांनी पुरस्कार स्वीकारताना शैक्षणिक क्षेत्रातील आव्हानांसाठी आमदार, शिक्षक संघटना आणि संस्थाचालकांना एकत्र येण्याचे आवाहन केले. शैक्षणिक कामांबरोबरच शिक्षकांवर अन्य कामांचे नाहक ओझे लादण्यात येत आहे. शिक्षकांचे ओझे कमी करण्यासाठी केंद्रीय राज्यमंत्री कपिल पाटील यांनी केंद्र सरकारच्या माध्यमातून पुढाकार घ्यावा, असे आवाहन स्वागताध्यक्ष आमदार निरंजन डावखरे यांनी केले. निवडणुकीच्या कामकाजासाठी शिक्षकांऐवजी बेरोजगार तरुणांना प्राधान्य द्यावे, अशी मागणीही त्यांनी केले. एन. एम. भामरे यांनी प्रास्ताविक केले, तर विकास पाटील, विनोद भानुशाली यांनी पाहुण्यांची ओळख करून दिली.

## माथेरानमधील रोजगाराचे प्रश्न घेऊन भाजपचे शिष्टमंडळ राजधानी दिल्लीत

माथेरानमध्ये केंद्रीय पर्यावरण मंत्रालयाने हस्तक्षेप करून विद्यार्थी आणि ज्येष्ठ नागरिकांसाठी ई–रिक्षा चालविण्यास परवानगी द्यावी, अशी मागणी स्थानिक हातरिक्षा संघटना अनेक वर्षे करीत असून सर्वोच्च न्यायालयात त्याबाबत याचिका दाखल करण्यात आली आहे, तर माथेरानला जाण्यासाठी सध्या एकमेव रस्ता असून केंद्रीय वन मंत्रालयाने पर्यायी रस्ते तयार करण्यासाठी परवानगी देण्यात यावी, अशी मागणी या वेळी करण्यात आली. माथेरान इको झोन लागू करताना विकास आराखडा मंजूर करण्यात आला आहे, पण त्यातील त्रुटींबद्दल हरकती घेऊनदेखील कोणताही निर्णय घेतला गेलेला नाही. याबाबत केंद्रीय पर्यावरणमंत्र्यांना अवगत करण्यात आले. त्याचप्रमाणे सन १९५९मध्ये सरकारने ब्रिटिश सरकारचे नियम कायम ठेवले आहेत. त्या कायद्यात बदल करण्याची प्रमुख मागणी शिष्टमंडळाने केली. याशिवाय माथेरानच्या जंगलात व्हॅली क्रॉसिंगच्या साहसी खेळास पर्यावरण मंत्रालयाने परवानगी द्यावी, अशी मागणी शिष्टमंडळाने केंद्रीय पर्यावरणमंत्री भूपेंद्र यादव यांची त्यांच्या कार्यालयात भेट घेऊन केली.

यानंतर भाजप शिष्टमंडळाने केंद्रीय रस्ते व भूपृष्ठ वाहतूकमंत्री नितीन गडकरी यांची भेट घेतली. माथेरानला येणारे पर्यायी रस्ते बनविण्याची गरज असून दोन रस्ते केंद्राने ठरविल्यास होऊ शकतात, अशी चर्चा झाली. त्यात ब्रिटिशांनी माथेरानला येण्यासाठी वापरलेला रस्ता आणि पनवेलमधील धोदाणी येथून येणारा रस्ता केंद्राने पुढाकार घेऊन बनवावा, अशीही मागणी मंत्री गडकरी यांच्यापुढे करण्यात आली.





**नवीन पनवेल : कार्थिका नायर हिने ७२०पैकी ७२० गुण मिळवत नीटच्या परीक्षेत भारतातून टॉप विद्यार्थिनीचा मान पटकावला. या उज्ज्वल यशाबद्दल राज्याच्या शिक्षणमंत्री वर्षा गायकवाड यांनी शनिवारी कार्थिकाची भेट घेऊन अभिनंदन केले आणि पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.**





**पनवेल भाजपतर्फे**
**जनहितार्थ**
**माहितीसाठी**

**पनवेल महानगरपालिका हद्दीत**
**रविवार, दि. १४ नोव्हेंबर २०२१ रोजी होणारे**

**कोरोना प्रतिबंधक लसीकरण**

**(सर्व केंद्रांवर ऑनलाइन व ऑफलाइन लसीकरण होईल)**

**कोविशिल्ड**

**सर्व केंद्रांवर पहिला व दुसरा डोस (वयोगट :** १८ वर्षांवरील सर्व नागरिकांसाठी)

■ १. यूपीएचसी–१, गावदेवी पाडा, पनवेल
■ २. यूपीएचसी–२, कोळेश्वर शाळा, कोळीवाडा, पनवेल
■ ३. यूपीएचसी–३, बांठिया स्कूलजवळ, नवीन पनवेल
■ ४. यूपीएचसी–४, गुरुद्वारासमोर, कळंबोली
■ ५. यूपीएचसी–५, डी–मार्टच्या मागे, सेक्टर १५, खारघर

*सहा नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रांवर (यूपीएचसी) परदेशी जाणाऱ्या नागरिकांसाठी दुसरा डोस उपलब्ध असेल.*

■ ६. आरोग्य उपकेंद्र, कर्नाटक समाज हॉलजवळ, नवीन पनवेल, सेक्टर २
■ ७. आरोग्य उपकेंद्र मनुस्मृती रोटरी क्लब, सेक्टर ३०, ओवे गाव, खारघर
■ ८. ज्ञानसाधना केंद्र, सेक्टर ६, कामोठे
■ ९. नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ पब्लिक हेल्थ ट्रेनिंग अ‍ॅण्ड रिसर्च सेंटर, से. १८, खांदा कॉलनी
■ १०. आरोग्य उपकेंद्र १, रोटरी कम्युनिटी सेंटर, सेंट जॉर्ज चर्चजवळ, नवीन पनवेल
■ ११. आरोग्य उपकेंद्र, नावडे, कळंबोली (उपप्रभाग समिती कार्यालय, नावडे, जुना पुणे–मुंबई हायवे)
■ १२. डॉ. आंबेडकर भवन, पनवेल
■ १३ न्यू इंग्लिश स्कूल, कळंबोली

**कोवॅक्सिन**

**सर्व केंद्रांवर पहिला व दुसरा डोस (वयोगट :** १८ वर्षांवरील सर्व नागरिकांसाठी)

■ १. आरोग्य उपकेंद्र काळभैरव मंगल कार्यालय, प्रभाग समिती ब कार्यालयाच्या बाजूला, कळंबोली
■ २. नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र ५, खारघर.


# महापारेषणला पुरस्कार जाहीर

**मुंबई : प्रतिनिधी**

नवी दिल्ली येथील ग्रीनटेक फाउंडेशनच्या वतीने दिला जाणारा यंदाचा आठवा सीएसआर इंडिया पुरस्कार–२०२१ महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीला (महापारेषण) मिळाला आहे. कोरोना काळात केलेल्या उल्लेखनीय कामाबद्दल महापारेषणला कोरोना योध्दा या गटात हा पुरस्कार मिळाला. २५ नोव्हेंबर २०२१ रोजी तमिळनाडूमधील महाबलीपूरम येथे हा पुरस्कार दिला जाणार आहे.

कोरोना महामारीमध्ये कंपन्यांनी केलेल्या उल्लेखनीय कामगिरीसाठी हा पुरस्कार दिला जातो. महापारेषण कंपनीने राज्य आपत्कालीन व्यवस्थापन विभागाला दोन कोटींचा निधी दिला. तसेच विदर्भातील कोरोना रूग्णांना आरोग्य सुविधा व उपचार मिळण्यासाठी विदर्भ रिलीफ कमिटी, विभागीय आयुक्त नागपूर, अमरावती व नागपूर व अमरावती विभागातील सर्व जिल्हाधिकाऱ्यांच्या माध्यमातून २०० लसीकरण व्हॅन उपलब्ध करण्यात आल्या.

यासाठी २५ कोटींचा खर्च आला. या २०० लसीकरणाच्या व्हॅन विदर्भातील दुर्गम भागातील खेड्यापाड्यात लसीकरणाची सुविधा पोहचविण्यासाठी तसेच समाजातील दुर्बल घटक, गर्भवती महिला, दिव्यांग, वृध्द व्यक्ती तसेच इतर आजाराने ग्रासलेले जे लसीकरण केंद्रापर्यंत पोहोचू शकत नाहीत, त्यांना लसीकरणाची सुविधा पोहचण्यासाठी मदत होणार आहे. तसेच नागपूर शहरातील कोरोनाच्या गरीब व गरजू रूग्णांना दोन कोटींच्या आरोग्य सुविधा व उपचार करण्यात आले. या पुरस्कारामुळे कंपनीचे सर्वस्तरातून कौतुक होत आहे.

कोरोना काळात महापारेषणने सामाजिक दृष्टिकोन ठेवून समाजातील गरीब व गरजू रूग्णांना आरोग्य सुविधा व उपचार देण्याचे काम केले आहे. समाजातील सर्व घटकांना न्याय देण्याचे काम महापारेषण 'सीएसआर'च्या माध्यमातून करीत आहे, असे महापारेषणचे अध्यक्ष तथा एमडी दिनेश वाघमारेंनी सांगितले.




# सार्वजनिक-खाजगी क्षेत्राची भागीदारी प्रभावशाली

## ▪ केंद्रीय मंत्री सर्बानंद सोनोवाल यांचे मत; जेएनपीटी बंदराला सदिच्छा भेट

**उरण : वार्ताहर, प्रतिनिधी**

केंद्रीय बंदरे, नौकानयन आणि जलमार्ग व आयुष मंत्री सर्बानंद सोनोवाल यांनी शनिवारी (दि. १३) जेएनपीटी बंदरात भेट दिली. भेटीदरम्यान सोनोवाल यांनी बंदराच्या कामकाजाची, बंदरातील पायाभूत सुविधांची तसेच बंदराने केलेल्या तांत्रिक प्रगतीची माहिती घेतली. या वेळी त्यांनी जेएनपीटीमधील सार्वजनिक-खाजगी भागीदारीमुळे बंदराच्या कामकाजाचे व्यवस्थापन अधिक प्रभावीपणे होण्याबरोबरच बंदरामध्ये नवीन पायाभूत सुविधा विकसित होतील, असे मत मांडले.

सोनोवाल यांनी सार्वजनिक-खाजगी क्षेत्राच्या भागीदारीमुळे जेएनपीटी बंदराने केलेल्या प्रगतीचा आढावा घेतला व जेएनपीटीच्या प्रमुख भागधारकांशी संवाद साधला. या वेळी आमदार महेश बालदी, जेएनपीटीचे अध्यक्ष संजय सेठी, उपाध्यक्ष उन्मेष शरद वाघ यांनी मंत्री सर्बानंद सोनोवाल यांचे स्वागत केले. केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दलाच्या जवानांनी 'गार्ड ऑफ ऑनर' दिला.





*केंद्रीय मंत्री सर्बानंद सोनोवाल यांनी करळ जंक्शन येथे जेएनपीटी पोर्ट रोड कॉंक्रिटीकरण प्रकल्पाचे भूमिपूजन केले आणि जेएनपीटीच्या अत्याधुनिक सेंट्रलाइज्ड पार्किंग प्लाझातील अत्याधुनिक सोयीसुविधांचा आढावा घेण्यासाठी पार्किंग प्लाझाच्या कमांड सेंटरला भेट दिली. जीटीआय हाऊसमधील टर्मिनल कामकाजाचा आढावा घेतला जहाजावर जाऊन कामाची पाहणी केली. त्यानंतर जेएनपीटीच्या बहुउत्पादन सेझ आणि हिंद टर्मिनल सीएफएसला भेट दिली, तसेच बीएमसीटीपीएलने हाती घेतलेल्या 'स्मार्ट पोर्ट इनिशिएटिव्ह'चा व दुसऱ्या टप्प्यातील विस्ताराच्या प्रगतीचा आढावा घेतला.*

सोनोवाल म्हणाले की, सार्वजनिक व खाजगी क्षेत्राच्या भागीदारीमुळे देशाच्या प्रगतीमध्ये कसे परिवर्तन होवू शकते आणि देशाचा विकास कसा गतिमान होवू शकतो याविषयी माहिती दिली. जगातील बहुतेक सर्व व्यापार हा समुद्रमार्गे होतो व बंदरे ही संपूर्ण उपखंडातील व देशांतर्गत वाहतूक नेटवर्क (म्हणजे रस्ते, रेल्वे, अंतर्देशीय जलमार्ग) आंतरराष्ट्रीय बाजारपेठेशी जोडणारी महत्त्वाची केंद्रे आहेत. म्हणून, जेएनपीटी मधील सार्वजनिक-खाजगी भागीदारीमुळे एक सशक्त व प्रभावी सागरी वाहतूक पायाभूत सुविधा विकसित होण्यास मदत होईल जी देशाच्या आर्थिक विकासाचा एक महत्त्वाचा घटक असेल. जेएनपीटी मधील सार्वजनिक-खाजगी भागीदारीमुळे बंदराच्या कामकाजाचे व्यवस्थापन अधिक प्रभावीपणे होण्याबरोबरच बंदरामध्ये नवीन पायाभूत सुविधा विकसित होतील.

सोनोवाल यांनी जेएनपीटीने केलेल्या आयात-निर्यात व्यापार केंद्रित उपाययोजना व सुलभ दळणवळणासाठी केलेल्या जागतिक दर्जाच्या सोयीसुविधा देशातील बंदर आधारित औद्योगिक विकासासाठी कशाप्रकारे दिशादर्शक ठरल्या आहेत व त्यामुळे जेएनपीटी हे कशाप्रकारे व्यापार वर्गाचे पहिल्या पसंतीचे बंदर बनले आहे याचा विशेष उल्लेख केला. सोनोवाल पुढे म्हणाले, जेएनपीटी आपल्या कामकाजामध्ये सातत्यपूर्ण तांत्रिक प्रगती आणि बहुविध पायाभूत सुविधां विकसित करुन देशाच्या बंदर आधारित औद्योगिक विकासाचे नेतृत्व करेल व २०३०पर्यंत एक मेगा पोर्ट म्हणून विकसित होईल.

जेएनपीटीने नुकतीच सुरू केलेली 'ड्वार्फ कंटेनर ट्रेन' सेवा, वाढवण बंदराची सद्यस्थिती तसेच जेएनपीटीच्या इतर पायाभूत सुविधा प्रकल्पांसह 'व्यवसाय सुलभीकरणासाठी' जेएनपीटीने हाती घेतलेल्या विविध उपक्रमांची माहिती जेएनपीटीच्या अधिकाऱ्यांनी मंत्री महोदयांना दिली.

> **जेएनपीटी हे देशाच्या सागरी क्षेत्रासाठी प्रमुख प्रेरकस्थान राहिले आहे; मंत्रालयाच्या सातत्यपूर्ण पाठिंब्याने आणि प्रोत्साहनाने, भारताच्या निर्यात क्षमतेचा आणि सागरी अर्थव्यवस्थेचा फायदा घेऊन आम्ही निश्चितपणे आमच्या विकासाचा आलेख चढताच ठेवू.**
> **-संजय सेठी, अध्यक्ष, जेएनपीटी**



# पनवेलमधील शासकीय विश्रामगृह समस्यांच्या विळख्यात

## सा. बां. विभागाने लक्ष देण्याची मागणी

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल शहराजवळून जाणाऱ्या पंचमुखी मारुती मंदिराजवळ असलेले शासकीय विश्रामगृह हे सध्याच्या स्थितीला अनेक समस्यांच्या विळख्यात असून येथे येणाऱ्या मंत्री, आमदार, खासदारांसह शासकीय अधिकाऱ्यांना वेगवेगळ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे.

मुंबईकडून पुण्याच्या दिशेने किंवा कोकणात जाण्यासाठी महामार्गालगत असलेले शासकीय विश्रामगृह हे अनेकांचे विश्रांती घेण्याचे ठिकाण होते. अनेक केंद्रीय व राज्यमंत्री, तसेच विविध आमदार, खासदार, शासकीय अधिकारी, कर्मचारी, पत्रकार येथे थांबतात. कित्येक वेळा शासकीय बैठकाही होतात. पत्रकार परिषदाही होतात, परंतु गेल्या काही वर्षांपासून या शासकीय विश्रामगृहाकडे सार्वजनिक बांधकाम विभाागने पूर्णतः दुर्लक्ष केल्याने पूर्वीची असलेली रया आता निघून गेली आहे. याची बांधणी साधारण १९१०च्या सुमारास झाली आहे. अत्यंत जुने बांधकाम व त्या काळात असलेले लाकूड, दगडे व इतर साहित्याच्या माध्यमातून येथे उभारणी करण्यात आली आहे.

विश्रामगृहातील दोन व्हीआयपी कक्ष, सभागृह व साधी निवासस्थान व मागील बाजूस शौचालय, बाथरुम व किचन अशा स्वरुपाचे हे विश्रामगृह असले तरी या विश्रामगृहाची अवस्था अत्यंत बिकट झाली आहे. अनेक ठिकाणी लाकूड व भिंतीला वाळवी लागली आहे. बैठकांचे कुशण निघाले आहेत. चादरी, उशांची अभ्रे फाटलेली आहेत. त्यात ढेकुणांचा सुळसुळाट आहे. तसेच सभागृहात असलेल्या खुर्च्या सुद्धा गायब झाल्या असून राष्ट्रीय नेत्यांचे फोटो सुद्धा धुळखात पडले आहेत.

या ठिकाणी असणारे खानसामे सुद्धा आजारी अवस्थेत असल्याने येथे आवश्यक असणारी कुठलीही सोयी सुविधा उपलब्ध नाही आहे. कोकण तसेच घाट माथ्यावर जाणाऱ्या मार्गावरील मुख्य विश्रामगृह असल्याने त्याची जास्तीत जास्त चांगली सोयी सुविधा व उभारणी होणे गरजेचे असतानाही सार्वजनिक बांधकाम खात्याकडून थातुरमातूर कामे केली जात असल्याने येथे येणारे संताप व्यक्त करीत आहेत.

पनवेल आज चोहोबाजूने वाढत असल्यामुळे शासकीय विश्रामगृहसुद्धा चांगल्या पद्धतीचे व सर्व सोयीसुविधायुक्त असणे गरजेचे असतानाही या ठिकाणी संबंधित विभाग दुर्लक्ष करीत असल्याने सर्वांनी नाराजी व्यक्त केली आहे.

# कामोठ्यात एकाला लुटले

**पनवेल : वार्ताहर**

बँकेतून काढलेली तीन लाख ५० हजारांची रोख रक्कम घेऊन जाणाऱ्या व्यक्तीच्या हातातील रोख रकमेची पिशवी मोटारसायकलवरून आलेल्या दोघा लुटारूंनी लुटून पलायन केले. ही घटना कामोठे सेक्टर-२१ मध्ये घडली. कामोठे पोलिसांनी लुटारूंविरोधात जबरी चोरीचा गुन्हा दाखल करून त्यांचा शोध सुरू केला आहे.

या घटनेतील तक्रारदार रंगनाथ दाते (वय ४५) हा कामोठे सेक्टर-८मध्ये कुटुंबासह राहण्यास असून त्याचा सेक्टर-२१ मध्ये मनी ट्रान्स्फरचा व्यवसाय आहे. दाते याने आपल्या व्यवसायासाठी बँकेतून तीन लाख ५० हजार रुपये घेऊन कार्यालयाच्या दिशेने जात होता. याच वेळी मोटरसायकलवरून आलेल्या दोघा लुटारूंनी त्याच्या हातातील तीन लाख ५० हजारांची रोख रक्कम असलेली पिशवी लुटून पलायन केले. या घटनेनंतर रंगनाथ दाते याने कामोठे पोलीस ठाणे गाठून तक्रार दाखल केली.

# भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील आज पनवेलमध्ये

## विक्रांत पाटील यांच्या जनसेवा कार्यालयाचे करणार उद्घाटन

**पनवेल : वार्ताहर**

भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते भारतीय जनता युवा मोर्चा प्रदेशाध्यक्ष तथा नगरसेवक विक्रांत बाळासाहेब पाटील यांच्या जनसेवा कार्यालयाचे उद्घाटन रविवारी (दि. १४) सायंकाळी ४ वाजता आयोजित करण्यात आले आहे.



या कार्यक्रमास विशेष उपस्थिती म्हणून माजी पालकमंत्री तथा विद्यमान आमदार रवींद्र चव्हाण, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांची उपस्थिती लाभणार आहे.

तर प्रमुख उपस्थिती भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, भाजप प्रदेश सदस्य बाळासाहेब पाटील, महापौर डॉ. कविता चौतमोल, सभागृह नेते परेश ठाकूर यांची असणार आहे, तसेच सभापती, नगरसेवक आदी उपस्थित राहणार आहेत.

उद्घाटन कार्यक्रमानिमित्त संवाद कार्यक्रम पनवेलच्या वीर सावरकर चौक रोडवरील अशोक बागच्या विरुपाक्ष हॉलमध्ये होणार आहे.


नगरसेवक विक्रांत पाटील यांच्या कार्यालयाचे नूतनरूप अद्ययावत करण्यात आले आहे. या कार्यक्रमास उपस्थित राहावे, असे आवाहन भाजप युवा मोर्चातर्फे करण्यात आले आहे.

# खारघरच्या डोंगरावरील आग आटोक्यात

**पनवेल : वार्ताहर**

तळोजा कारागृहाशेजारी असलेल्या डोंगरावर लागलेली आग विझविण्यात पर्यावरणप्रेमींना यश आले. काही तरुणांनी संध्याकाळी डोंगरालगत फटाके फोडल्यामुळे डोंगरावर आग लागली होती. दरम्यान, तरुणांनी वनसंपदा नष्ट करण्याऐवजी वाचविण्यासाठी सहकार्य करावे, तसेच डोंगरावर फटाके फोडू नयेत, असे आवाहन पर्यावरणप्रेमींनी केले आहे.

खारघर सेक्टर-३५ मधील तळोजा कारागृहालगत असलेल्या



डोंगरावर वणवा पेटला. या वेळी डोंगरावर गेलेल्या चार ते पाच तरुणांनी आग विझविण्यास सुरुवात केली. दरम्यान, एका नागरिकाने या आगीबाबत खारघर अग्नीशमन केंद्राला माहिती दिली. त्यानंतर काही वेळाने अग्निशमन दल जवानांनी घटनास्थळी येऊन डोंगराच्या पायथ्याशी लागलेली आग आटोक्यात आली.

दरम्यान, डोंगरमाथ्यावर वणवा लागल्याचे नागरिकांच्या निदर्शनास आले, मात्र डोंगरावर अग्निशमन दलाचा बंब पोहचू शकत नसल्यामुळे आग्निशमन दल जवान माघारी फिरले. या वेळी पर्यावरण आणि पक्षीप्रेमी ज्योती नाडकर्णी, तसेच त्यांचे दोन सहकारी डोंगरावर लावलेल्या रोपट्यांलगतची गवत काढत होते. त्या तिघांनी डोंगर माथ्यावर लागलेली आग रात्री साडेआठ वाजताच्या सुमारास आटोक्यात आणली.

या डोंगरावर पर्यावरणप्रेमींनी लावलेली रोपटी आगीपासून सुरक्षित आहेत, मात्र पावसाळ्यात डोंगरावर उगवलेली नैसर्गिक रोपटी जळून खाक झाली. तिघांनी आग आटोक्यात आणली नसती, तर ओवे डोंगरावर लागलेला वणवा आटोक्यात आला नसता. त्यामुळे हजारो झाडे जळून खाक झाली असती. पुन्हा डोंगर परिसरात वणवा लागू नये म्हणून गवत कापणीचे काम सुरू करण्यात आले आहे, अशी माहिती ज्योती नाडकर्णी यांनी दिली.

# पनवेल आगारातील १५ कर्मचाऱ्यांचे निलंबन

**पनवेल : प्रतिनिधी**

राज्य परिवहन महामंडळाच्या कर्मचाऱ्यांनी राज्यव्यापी उपोषण सुरू केले आहे. त्याचाच एक भाग म्हणून पनवेल बस आगारातील एसटी कर्मचाऱ्यांनी ही कामबंद आंदोलन भाग घेतल्याने पनवेल आगार बंद असून एकही गाडी सुटली नाही. त्यामुळे शुक्रवारी (दि. १२) आंदोलन चिरडून टाकण्यासाठी पनवेल आगारातील १५ कर्मचाऱ्यांवर महामंडळाने निलंबनाची कारवाई केली आहे.

पनवेल आगारात एकूण ३०५ कर्मचारी कार्यरत आहेत. यामध्ये चालक, वाहक व वाहन दुरुस्ती करणारे कर्मचारी आहेत. या संपामुळे पनवेल आगाराचे कामकाज ठप्प झाले आहे. या आंदोलनाचा फटका प्रवाशांना बसला आहे. पनवेल शहर हे दळणवळणाच्या दृष्टीने मध्यवर्ती ठिकाण आहे. मुंबई, ठाणे, कल्याण आदींसह घाटमाथा, कोकणात पनवेल बस आगारातून गाड्या सुटत असल्याने प्रवाशांची मोठी वर्दळ या ठिकाणी असते. आगारातील वाहक, चालक आणि कार्यशाळेतील कर्मचाऱ्यांनी मागण्या जोपर्यंत मंजूर केल्या जात नाहीत, तोपर्यंत हा संप सुरू राहणार असल्याची भूमिका घेतल्याने हे आंदोलन चिरडून टाकण्यासाठी महामंडळाने पनवेल आगारातील तीन चालक, नऊ वाहक, एक कार्यशाळा कर्मचारी, एक वाहतूक नियमत्रक व एक चालक-वाहक (चावा) यांच्यावर निलंबनाची कारवाई केली आहे.

पनवेल आगारातील १५ कर्मचाऱ्यांवर निलंबनाची कारवाई केली असली, तरी शनिवारी पनवेल आगारातून एकही गाडी सुटली नाही. सकाळ आणि दुपारच्या शिफ्टमधील २२ कार्यशाळा कर्मचारी मात्र कामावर हजर झाले होते. पनवेल आगारातून बीईएसटीतर्फे सकाळी ८.४५ पासून दिवसभरात १२ गाड्या चालवल्या जात आहेत.

# नवी मुंबईतील बेशिस्त वाहनचालकांवर कारवाई

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबईत वाहतूक पोलिसांनी दिवाळीत हेल्मेटविना प्रवास करणाऱ्या दुचाकीचालकांवर एक विशेष कारवाई मोहीम हाती घेतली होती. यात सहप्रवाशालाही हेल्मेट नसल्यास दंड आकारला गेला. यात मागील ११ दिवसांत १२ हजार दुचाकी चालकांवर दंडात्मक कारवाई केली. सोमवारपासून सिग्नल तोडणाऱ्या वाहनचालकांवर कारवाई करण्यात येणार आहे. हेल्मेट नसल्यास दुचाकीचालकांना ५०० रुपयांचा दंड आकारण्यात आला असून कावरवाई सुरूच राहणार आहे.



> **दुचाकीवरून प्रवास करताना दोघांनीही हेल्मेट घालणे हे सक्तीचे आहे. दुचाकीचालक हेल्मेट घालतो, परंतु सहप्रवासी हेल्मेट घालत नाही. त्यालाही हेल्मेट स्क्तीचे आहे. हा नियम न पाळणाऱ्या दुचाकीचालकांवर ५०० रुपये दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे. नागरिकांनी दुचाकीवरून जाताना दोघांनीही हेल्मेट घालणे आवश्यक आहे. यापुढेही कारवाई सुरूच राहणार आहे.**
> **-पुरुषोत्तम कराड, उपायुक्त, वाहतूक विभाग**

नवी मुंबईत शीव-पनवेल महामार्ग तसेच पामबीच रस्त्यासह अंतर्गत मुख्य रस्त्यांवर भरधाव दुचाकी चालविणाऱ्यांचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे. शहरात नियमानुसार हल्मेट सक्ती करीत ती चालकासह सहप्रवाशालाही बंधनकारक करण्यात आली आहे. मात्र अनेकदा दुचाकीचालकच हेल्मेट घालत नाहीत तर सहप्रवाशी कसे घालणार? यामुळे वाहतूक विभाग उपायुक्त पुरुषोत्तम कराड यांच्या आदेशानुसार विशेष कारवाई मोहीम राबविण्यात आली.

वाहतूक पोलिसांनी विना हेल्मेट दुचाकीस्वारांवर कारवाईचा बडगा उगारल्यानंतर आता सिग्नल तोडणाऱ्या वाहनचालकांवर सोमवारपासून विशेष कारवाई करण्यात येणार आहे. त्यामुळे वाहतुकीचे नियम पाळा, असे आवाहन वाहतूक विभाग पोलीस उपायुक्त पुरुषोत्तम कराड यांनी केले आहे. १० नोव्हेंबर रोजी केलेल्या कारवाईत पनवेल शहरात १३५, तळोजात १०२ तर खारघरमध्ये ६४ कळंबोली ५९ व नवीन पनवेलमध्ये ३५ जणांवर कारवाई करण्यात आली आहे.

# नवी मुंबईत रुग्णालयांची होणार अग्निसुरक्षा तपासणी

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

नगर येथील रुग्णालयातील आग दुर्घटनेनंतर नवी मुंबई महापालिकेच्या अग्निशमन विभागाकडून शहरातील सर्व खासगी तसेच महापालिका रुग्णालयांची अग्निसुरक्षा यंत्रणा तपासणी सुरू केली आहे. पुढील आठ दिवसांत १४ अधिकाऱ्यांचे पथक शहरातील सर्व रुग्णालयांना भेटी देणार असून तपासणी करणार आहेत.

यात खासगी २१९ रुग्णालयांसह महापालिकेची पाच रुग्णालये आणि २३ नागरी आरोग्य केंद्रांचाही समावेश आहे.

यात कायमस्वरूपी आग विझविण्याची यंत्रणा कार्यान्वित आहे का? अग्निशमन पंप सुरू आहे का? स्प्रिंकल्स आहेत का? आदी यंत्रणांबाबत तपासणी करण्यात येणार आहे.

एप्रिल महिन्यात ५१ रुग्णालयांची झाडाझडती घेण्यात आली होती. त्यात ४० पैकी ३१ रुग्णालये पूर्ण क्षमेतेने सुरू होती, मात्र उर्वरित रुग्णालयात त्रुटी आढळ्या होत्या. त्या त्रुटी दूर केल्याचा अहवालही देण्यात आला आहे असा दावा अग्निशमन विभागाने केला आहे. दर सहा महिन्याला रुग्णालयांनी महापालिकेला अहवाल देणे क्रमप्राप्त आहे तर महापालिकेनेही रुग्णालयांची तपासणी करणे बंधनकारक आहे.

> **नगर येथील रुग्णालयातील आग दुर्घटनेच्या अनुषंगाने नवी मुंबई महापालिका अग्निशमन विभागाने शहरातील खाजगी रुग्णालयांसह महापालिका रुग्णालयांची अग्निसुरक्षा तपासणी सुरू केली आहे.**
> **-पुरुषोत्तम जाधव, अग्निशमन विभागीय अधिकारी, नवी मुंबई महापालिका**





**कळंबोली : डीडीएसआर बिल्डर्स अॅण्ड डेव्हलपर्सच्या वतीने कळंबोली सेक्टर ६ई येथे तथागत ही बिल्डिंग उभारण्यात येत आहे. या बिल्डिंगच्या कामाचे भूमिपूजन शनिवारी राज्याच्या शिक्षणमंत्री वर्षा गायकवाड यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी पनवेलचे उपमहापौर जगदिश गायकवाड, नगरसेविका विद्या गायकवाड, भाजपचे कळंबोली शहर अध्यक्ष रविनाथ पाटील, तेजस चाफेकर आदी उपस्थित होते.**

**खारघर : खुटूक बांधण येथील घरत कुटुंबीयांच्या राधाकृष्ण मंदिराचा वर्धापन दिन सोहळा मोठ्या उत्साहात साजरा झाला. या ठिकाणी भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी शनिवारी भेट देऊन दर्शन घेतले. या वेळी भाजप उत्तर जिल्हा उपाध्यक्ष वासुदेव घरत, महापालिका प्रभाग समिती 'अ'च्या सभापती अनिता पाटील, भाजप युवा मोर्चा अध्यक्ष विनोद घरत, दिनेश खानावकर, वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीपन शिंदे, गोपनीय अंमलदार जितेंद्र म्हात्रे, अल्पसंख्याक चिटणीस मन्सूर पटेल, पप्पू खामकर, अक्षय पाटील, आदित्य घरत, युवा नेते शुभ पाटील आदी उपस्थित होते.**





# पारदर्शी आर्थिक व्यवहार आवडे का सर्वांना?

**तंत्रज्ञानाच्या मदतीने आर्थिक व्यवहारांमध्ये जी पारदर्शकता येते आहे, त्याचा अनेकांना त्रास होतो आहे, असे दिसते आहे. पण ते सर्व आता सोपे सुटसुटीत, आर्थिक विषमता कमी करण्यासाठी आणि देशासाठी चांगले आहे, हे समजून घेतले की पारदर्शी आर्थिक व्यवहार आपल्यालाही आवडू लागतील. कारण हा प्रवास आता अपरिहार्य असा आहे.**

अर्थ प्रहर




यमाजी मालकर
(ymalkar@gmail.com)

आर्थिक व्यवहार पारदर्शी झाले तर किती फरक पडतो, याचे एक छोटे उदाहरण म्हणजे आपल्या देशात होत असलेली महामार्गावरील टोल पद्धत. कोरोनापूर्वीचे वर्ष म्हणजे २०१८-१९. त्या आर्थिक पूर्ण वर्षात ही वसुली २४ हजार ३९६ कोटी रुपयांची झाली होती. त्या वेळी महिन्याची सरासरी होती २०३३ कोटी तर दररोजचा महसूल होता सरासरी ६६.८४ कोटी रुपये. ही माहिती रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी ९ डिसेंबर रोजी लोकसभेत दिली होती. कोरोनाच्या संकटानंतर सर्व व्यवहार पूर्वीप्रमाणे सुरू झाल्यानंतर आणि आता फास्ट टॅगची पद्धत सुरू झाली आहे. त्यामुळे महामार्गावरील प्रवास वेगवान तर झाला आहेच, पण महसूल किती वाढला आहे, ते पाहू.




## फास्ट टॅगमुळे गळती कमी

**गेल्या आठवड्यात प्रसिद्ध झालेल्या आकडेवारीनुसार ऑगस्टमध्ये तब्बल ३०७६ कोटी, तर सप्टेंबरमध्ये ३००० कोटी रुपयांचा महसूल जमा झाला आणि ऑक्टोबरमध्ये तर तब्बल २१.४२ कोटी व्यवहार झाले आणि त्यातून तीन हजार ३५६ कोटी रुपये इतका विक्रमी महसूल जमा झाला. त्यातील एका शनिवारी म्हणजे एका दिवसाला १२२.८१ कोटी रुपये महसूल जमा झाला. म्हणजे पाहा, एका वर्षाला किमान एक हजार कोटी रुपये अधिक जमा झाले, तर दिवसाचा विचार करता दुप्पट महसूल जमा होऊ लागला. वाढलेल्या गाड्या आणि या काळात काही टोल प्लाझाची संख्या वाढली असणार, असे गृहीत धरले तरी हा फरक खूपच मोठा आहे, हे लक्षात येते. याचाच दुसरा अर्थ असा की पूर्वी महसुलाला मोठी गळती लागली होती, ती नव्या पारदर्शी पद्धतीने कमी झाली आहे. आता फास्ट टॅगची पद्धत अगदी प्रथम सुरू झाली, तेव्हाची चर्चा आठवून पाहा. फास्ट टॅग कसे चालत नाहीत, ही पद्धत भारतात कशी चालणार नाही, याची चर्चा सातत्याने केली जात होती. ही पद्धत नवी असल्यामुळे तिच्यात साहजिकच काही दोषही होतेच, त्यामुळे त्यातील त्रुटीच्या मोठमोठ्या बातम्याही होत होत्या. पण ही पद्धत जसजशी रुळली, तशा या बातम्या कमी झाल्या आणि सर्व नागरिकांनी फास्ट टॅगचा स्वीकार केला. त्यामुळेच त्या पद्धतीतून येणारा महसूल मोठ्या प्रमाणावर वाढला आहे. तंत्रज्ञानाचा स्वीकार आणि पारदर्शी व्यवहाराचे स्वागत केल्यामुळे हा बदल होऊ शकला.**




## आर्थिक व्यवहारांचे वार्षिक स्टेटमेंट

इन्कम टॅक्स भरण्याची ही प्रक्रिया अधिक सुलभ व्हावी म्हणून आता आणखी एक चांगला प्रयत्न होताना दिसतो आहे. तो म्हणजे इन्कम टॅक्स दात्याने वर्षभरात केलेल्या सर्व व्यवहारांची नोंद असलेले स्टेटमेंट (Annual Information Statement AIS) इन्कम टॅक्सच्या पोर्टलवर उपलब्ध असणार आहे. ज्यात त्या नागरिकाने वर्षभरात केलेली घर, जमीन, शेअर, म्युच्युअल फंड, विमा अशा सर्व प्रकारच्या खरेदी विक्रीची आणि त्यातून त्याला झालेल्या नफ्या-तोट्याची नोंद असणार आहे. असे व्यवहार करताना आता पॅन कार्डची नोंद करणे बंधनकारक असल्याने हे शक्य होणार आहे. ज्या बँक खात्यातून हे व्यवहार होतात, त्या बँक खात्याशी पॅन कार्ड जोडलेले असते. त्यामुळे बँकेतून जे व्यवहार होतात, ते आपोआप नोंद होतात. त्या व्यवहारातील कोणते व्यवहार घर, जमीन, शेअर, म्युच्युअल फंड, विमा, सोने खरेदीसबंधी आहेत हेही आता लक्षात येते, कारण जेथे हे व्यवहार होत असतात, तेथेही पॅन कार्डवर त्याची नोंद झालेली असते. याचा अर्थ, संपत्ती आणि गुंतवणूकविषयक व्यवहार आता लपविता येणार नाहीत. हे व्यवहार लपवून इन्कम टॅक्स न भरण्याचे प्रमाण अधिक होते. त्यामुळे ही सुधारणा महत्त्वाची ठरणार आहे.

## ब्लॉकचेन तंत्रज्ञानामुळे बिनचूकता

वर्षभरातील अनेकांची अशा व्यवहारांची संख्या अधिक असल्याने आणि इतर काही त्रुटीमुळे या पद्धतीतही दोष आहेत, असे चित्र नजीकच्या भविष्यात उभे राहू शकते, पण ते दोष दूर होऊन इन्कमटॅक्स भरण्याची प्रक्रिया सुलभ आणि सुटसुटीत होईल, अशी अपेक्षा करूयात. सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे ब्लॉकचेन नावाच्या तंत्रज्ञानामुळे या नोंदी बिनचूक होतील आणि त्यामुळे त्यातील दोष कमी कमी होत जातील. कोट्यवधी रुपयांचा व्यवहार सेकंदाला होत असलेल्या बीटकॉईन डिजिटल चलनात हे तंत्रज्ञान वापरले जाते. शिवाय इंटरनेट बँकिंग त्यामुळेच शक्य होते. याचा अर्थ असे वार्षिक स्टेटमेंट अधिकाधिक बिनचूक होणे, ही काही फार अवघड बाब राहणार नाही.

इन्कमटॅक्स घेण्याची पद्धत अधिकाधिक सुलभ केली गेली पाहिजे आणि अर्थक्रांती म्हणते तसा बँक व्यवहार कर, हा एकमेव कर नागरिकांना द्यावा लागला पाहिजे, हे खरेच आहे. त्या दिशेने जाण्याचा विचार सरकारकडून कधी केला जाईल, याचा अंदाज करणे अवघड आहे, मात्र अशा काही सुधारणा, आदर्श अशा करपद्धतीच्या दिशेने जाण्याचा एक मार्ग ठरतील, एवढे नक्की. तंत्रज्ञानाच्या मदतीने आर्थिक व्यवहारांमध्ये जी पारदर्शकता येते आहे, त्याचा अनेकांना त्रास होतो आहे, असे दिसते आहे, पण ते सर्व आता सोपे सुटसुटीत, आर्थिक विषमता कमी करण्यासाठी आणि देशासाठी चांगले आहे, हे समजून घेतले की पारदर्शी आर्थिक व्यवहार आपल्यालाही आवडू लागतील. कारण हा प्रवास आता अपरिहार्य असा आहे.

## कर सोप्या पद्धतीने घेतला पाहिजे


**टोल जसाचार चाकी गाडी असलेल्या म्हणजे मध्यमवर्गीय आणि उच्चमध्यमवर्गीय नागरिकांना भरावा लागतो, तसेच इन्कमटॅक्स हा विशिष्ट वार्षिक उत्पन्न (अंदाजे पाच लाख रुपयांपेक्षा अधिक) असलेल्या नागरिकांना भरावा लागतो. पण इन्कमटॅक्स भरताना जो त्रास नागरिकांना होतो, त्यामुळे नागरिक त्रासलेले असतात. तो त्रास कमी व्हावा, म्हणून अनेक प्रयत्न केले जात आहेत. अगदी अलीकडे इन्कमटॅक्स पोर्टलचे काम आयटी क्षेत्रातील खाजगी कंपनी इन्फोसिसला देण्यात आले, पण मुळातच इन्कमटॅक्सच्या कायद्यात इतकी गुंतागुंत आहे की त्या पोर्टलवरून इन्कमटॅक्स भरताना अनेक अडचणी येऊ लागल्या. त्याचीही आपल्या देशात खूप चर्चा झाली, पण अखेर त्यातील अनेक त्रुटी दूर झाल्या आणि आता नागरिक त्यावर आपला इन्कमटॅक्स भरत आहेत. गेल्या आठवड्यातील आकडेवारीनुसार २.३८ कोटी करदात्यांनी आतापर्यंत इन्कमटॅक्स रिटर्न फाईल केले आहेत. कोरोनामुळे २०२०-२१ या आर्थिक वर्षांचे रिटर्न भरण्यास सरकारने दोन वेळा मुदतवाढ दिली असून आता ते ३१ डिसेंबरपर्यंत भरावयाचे आहेत. नव्या पोर्टलमुळे इन्कमटॅक्स भरणे सोपे झाले असावे. अर्थात, पोर्टलमध्ये असलेल्या त्रुटींवर सातत्याने काम सुरूच राहणार आहे. भारत सरकारला महसुलाची तूट ही कायम असते आणि ती कमी करण्याचा प्रयत्न केला जात असतो. त्या प्रयत्नांत सर्वात महत्त्वाचा भाग आहे तो, कर भरणे सुलभ, सुटसुटीत करणे आणि ते सर्व व्यवहार पारदर्शक करणे. अशा मार्गाने कर महसूल वाढतो, असा आतापर्यंतचा अनुभव आहे.**

---



# आपण 'डेनिस डिडरोट इफेक्ट'च्या प्रभावाखाली तर नाही ना?

**वस्तू कितीही चांगली असली; तरी तिचा आपल्या उपयोगितेशी व आनंदाशी काही संबंध असतोच, असे नाही किंवा तो आनंद क्षणिक असतो. कालांतराने तो आनंदही संपतो आणि पैसेही जातात. त्याला म्हणतात 'डेनिस डिडरोट इफेक्ट'. त्याच्या प्रभावाखाली आपण नाही ना, याचा विचार केलाच पाहिजे. म्हणून या प्रवृत्तीला आळा घालण्याची गरज आहे, पण त्यासाठी स्वतःच प्रयत्न करावा लागतो.**



प्रसाद ल. भावे
sharpadvisers@gmail.com

रशियात डेनिस डिडरोट नावाचा एक फ्रेंच तत्त्वज्ञानी होता. त्यानं खूप ग्रंथ वाचले होते. त्याचं स्वतःचं असं मोठं ग्रंथालय होतं. त्याचं संपूर्ण आयुष्य वाचनात, पण गरिबीत गेलं आणि मुलीच्या लग्नासाठी सुद्धा त्याच्याकडं पैसे नव्हते, इतका तो गरीब होता. त्या वेळी रशियाची राणी कँथरीनला डेनिस डिडरोटच्या गरिबीबद्दल कळलं आणि तिनं डिडरोटला त्याच्याकडील लायब्ररी विकत घेण्यासाठी १००० ग्रेट ब्रिटन पौंड म्हणजेच ५० हजार डॉलर्स (आजचे जवळपास साडेतीन कोटी रुपये) देऊ केले. अशाप्रकारे डेनिस डिडरोट एका दिवसात खूप श्रीमंत झाला. त्यानं त्या पैशातून लगेच 'स्कार्लेट रॉब', म्हणजे एक उच्च प्रतीचा व महाग असा पोषाख खरेदी केला. हा पोशाख वापरत असताना त्याला वाटलं की; आपण उच्च प्रतीचा पोषाख घालतोय परंतु आपल्या घरात मात्र तशा उच्चप्रतीच्या वस्तू नाहीत. मग त्यानं हळूहळू घरातल्या वस्तू बदलल्या. किचन रूममधल्या वस्तू बदलल्या. फर्निचर बदललं, सगळं काही नवं नवं घेतलं. आता त्याचं संपूर्ण घर आणि पोषाख दोन्हीही शोभून दिसत होतं, परंतु हे सगळं केल्यानं तो पुन्हा कंगाल झाला आणि कर्जही वाढत गेलं. मोठ्या दुःखानं डेनिस डिडरोटनं हे सहन केलं आणि मग त्यानं हे सगळे अनुभव आपल्या एका निबंधात लिहून ठेवले. यालाच मानस शास्त्रातील 'डिडरोट इफेक्ट' (Diderot Effect) म्हणतात.

मोठे उद्योजक, व्यापारी, ट्रेडर्स, डेव्हलपर्स, पुढारी सुद्धा; या इफेक्टचा छुप्या पद्धतीनं, अनावधानानं अवलंब करतात. याचे निरीक्षण आपण करून पहाण्यास हरकत नाही. या आधीच्या लेखात देखील ही गोष्ट मी उल्लेखली होतीच की कोणत्याही भव्य मॉलमध्ये खाली-वर जाण्यासाठी एस्कलेटर्स हे एकाखाली एक नसून विरुद्ध टोकाच्या दिशेला असतात जेणेकरून ग्राहक या टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत आपसूकच जातो व जाताना अनेक दालनं टेहाळतो. अगदी त्याचप्रमाणं डी-मार्टमध्ये सुद्धा एंट्रन्स समोर लेटेस्ट ऑफर्स मांडलेल्या असतात आणि बिलिंग काउंटर भोवती मुलांना आकर्षित करणाऱ्या गोष्टी, खास करून चॉकलेट्स असतात. कारण सहज आहे की बिल करताना भली मोठी रांग असल्यानं लहान मुलं कंटाळतात आणि ती त्या गोष्टी मागतात आणि त्यांना त्या नाइलाजानं दिल्या जातात (मानसिकता).

समजा आपण महागडी गाडी घेतली तर मग आपण गाडीला शोभेसे कपडे, शूज घेतो, त्याला साजेसं घड्याळ, पेन, गॉगल इ. घेतोच.

घरात मोठा टीव्ही आणला की लगेचच एचडी वाहिन्या सुरू करणार, चांगलं टेबल, फर्निचर, मग घराला नवा रंग लावला जाणार आणि त्याला मॅचिंग पडदे लावून सजावट करणार.

समजा आपण ५० हजार/एक लाखाचा मोबाईल घेतला तरी आपल्याला आणखी काहीतरी कमी आहे असं वाटतं आणि मग अजून मोबाईलला महागडा गोरील्ला ग्लास लावली जाते, ५०० रुपयांचं जुनं कव्हर बदललं जातं. मोबाईलला शंभर रुपयांचा हेडफोन चालला असता; पण अडीच-तीन हजाराचा हेडफोन घेतला जातो. कारण लाखाच्या मोबाईलला स्वस्त वस्तू शोभून दिसत नाहीत. हे सर्व कशासाठी? इतरांवर इंप्रेशन मारण्यासाठी अथवा स्टेटस वाढवण्यासाठी आणि वाढवलेलं स्टेटस जपण्यासाठी.. यालाच म्हणतात, 'डिडरोट इफेक्ट'.

थोडक्यात सांगायचं तर; एक नवीन वस्तू विकत घेतली की; तिच्यामुळे दुसऱ्या वस्तूचा दर्जा आपोआपच कमी होतो (तसं वाटतं) आणि तो वाढविण्यासाठी आपण आणखी जास्त खर्च करीत जातो. त्याचप्रकारानं मॉलमध्ये आपण एक वस्तू घ्यायला गेलो की दुसऱ्या वस्तू आपोआपच बघितल्या जातात आणि आपण त्या गरज नसली तरी घेतो. अशा पद्धतीनं आपण एक एक वस्तू घेऊन अनेक अनावश्यक किंवा फारशा महत्त्वाच्या नसणाऱ्या वस्तू घेत असतो आणि ते आपणांस कळत सुद्धा नाही. यालाच 'spiraling consumption' म्हणतात. ही सामान्य मानवी प्रवृत्ती (human tendency) आहे. या प्रवृत्तीचे परिणाम भयानक होत असतात; पण ते उघड्या डोळ्यांनी दिसत नाहीत. आपण नकळतपणे अनावश्यक खर्च करत जातो मात्र काही लोकांच्या हे लक्षात येतं, परंतु त्याकडं गांभीर्यानं पाहिलं जात नाही. तर काहींच्या खूप उशिरा लक्षात येतं आणि अनेकांच्या हे लक्षातच येत नाही. म्हणून ते खूप खर्च करीत जातात. माणसाला खर्च करताना भीती वाटत नाही; पण नंतर हिशोब लागत नाही; तेव्हा त्याचा त्रास होतो. म्हणून कोणतीही वस्तू खरेदी करताना; या वस्तूची मला कितपत गरज आहे? असा स्वतःच स्वतःला प्रश्न विचारावा. विचार करून त्याचं उत्तर खरंच जर होय आलं तरच ती वस्तू खरेदी करण्याचा निर्णय घ्यावा. असा निर्णय घेतल्यावर त्या वस्तूचा दर्जा आणि किंमत वाजवी आहे कां (worthiness and value for money)? याचा विचार करून मिळेल त्या किंमतीत न घेता ती वाजवी किंमतीत घेण्याचा प्रयत्न करावा. कारण दुकानदार एक वस्तू समोर ठेवतो; लगेच तो दुसरी वस्तू दाखवून संभ्रम निर्माण करतो. तेव्हा एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे की; ती वस्तू कितीही चांगली असली; तरी तिचा आपल्या उपयोगितेशी व आनंदाशी काही संबंध नसतो. तो आनंद क्षणिक असतो. कालांतराने तो आनंदही संपतो आणि पैसेही जातात. म्हणून या प्रवृत्तीला आळा घालण्याची गरज आहे, पण त्यासाठी स्वतःच प्रयत्न करावा लागतो.

मी मानसशास्त्रज्ञ किंवा तत्त्वज्ञानी नाही, परंतु आम्ही ज्या ध्येयांचा पाठपुरावा करतो, त्या गोष्टींचा विचार करण्यात मी बराच वेळ घालवला आहे. आम्ही आमच्या गरजेपेक्षा जास्त सामग्री खरेदी करतो अशी अनेक कारणे आहेत, आजूबाजूच्या वातावरणातून काही उत्प्रेरणा आपल्यावर लादल्या जातात व इतर कारणं आपल्या स्वतःच्या अंतर्गत प्रेरणांमधून उद्भवतात आणि त्यासाठी अनेकदा वायफळ खर्च केला जातो. कोणत्याही प्रकारे, आपण जे काही करतो ते आपण का विकत घेतो याची समज असणं हा एक योग्य प्रयत्न आहे. मला डिडरोट इफेक्ट आणि त्याचा ग्राहकोपयोगी वस्तूंशी संबंध इतका मनोरंजक वाटला की डेनिस डिडरोट नावाच्या फ्रेंच तत्त्ववेत्त्यानं १८ व्या शतकात मूळतः नोंदवलेली अतिउपभोगाची ही प्रेरणा आपल्यामध्ये अजूनही सामान्यपणे आढळणारी बाब आहे हे लक्षात येते.




डिडेरोट इफेक्टचे सर्वात सोपं वर्णन म्हणजे, खिशात पैसा खुळखुळू लागला की आपल्यातील उपभोग घेण्याची मानसिकता उफाळून येते आणि बऱ्याचदा याचं पर्यवसान चंगळवादाकडं जातं. नुकतंच गेल्या वर्षी आमच्या घराचं रिनोव्हेशन झालं, म्हणजे केवळ करायचं म्हणून सुशोभीकरण नव्हे, तर सोयीसाठी दोन फ्लॅट्सचा एक फ्लॅट केला गेला परंतु त्यामागोमाग नवीन सोफा सेट्स, कुशन्स, स्पेशल लाईट्स, त्यास साजेशी कार्पेट्स, चिमणी, टीव्ही, फ्रिज, मायक्रोवेव्ह, ओटीजी, मग त्यासाठी वेगळी भांडी, नवीन डिनरसेट, क्रोकरी हे आपसूकच घेतलं गेलं. गरजेची गोष्ट खरंतर घर बनवणं ही होती परंतु त्यामुळं पुढील खर्चाची इच्छा निर्माण झाली जे एक माणूस कसा अडकत जातो, याचेउदाहरण आहे. अशाप्रकारे, हा Diderot Effect आमच्या ग्राहकांच्या खरेदीवर कसा प्रभाव पाडतो हे उत्तम प्रकारे स्पष्ट करते. आपल्या फिक्शनमध्ये डिडरोट लिहितात की त्यांच्या उच्च रॉबनंतर अनेक गोष्टी गरज नसतानाही बदलल्या जातात. कथेच्या शेवटी, ते लिहितात मी माझ्या जुन्या ड्रेसिंग गाऊनचा पूर्ण मालक होतो, परंतु आता मी माझ्या नवीन गोष्टींचा गुलाम झालो आहे. म्हणूनच, एका खरेदीमुळं अधिक, अनियोजित खरेदी कशी होते याची मेख समजून घेतल्यानंतरच तुम्ही त्याचं (दुष्ट)चक्र खंडित करू शकाल.

हीच गोष्ट नवीन घर व गाडी घेतानाही. घराची गरज असताना घर घेणं आवश्यक आहे, परंतु केवळ गुंतवणूक म्हणून किंवा अमूक एक एरियात फ्लॅट असावा म्हणून स्टेटस वाढवण्यासाठी लोक २-४ घरं घेऊन ठेवतात. परवाच माझ्या मित्रानं अव्वाच्या सव्वा लोन करून पेंट हाऊस खरेदी केलं, यावरून एक ब्रिटिश म्हण आठवली, Fools build houses, and wise men live in them या बाबतीत पुढच्या लेखात. कारच्या बाबतीत अगदी माझीच गोष्ट सांगतो, गेले वर्षभर माझा विचार होता की (१५ वर्षे) जुनी गाडी विकून नवीन घ्यावी, परंतु माझ्यातील गुंतवणूकदार जागा झाला आणि मी काही गणितं मांडली,

१) गाडीचा वापर किती होऊ शकतो (नव्याची नवलाई सोडून)? तर केवळ महिन्यातून एखाद्या वेळेस दोन दिवसांची सुटी घालवायला शहराबाहेर गेल्यास ३०० किमी अन्यथा गाडी पडून राहणार. मग सुटीचं प्लॅनिंग म्हणजे हॉटेलिंग, खाणं पिणं, शॉपिंग असे इतर खर्च आलेच, ते वेगळे, (परत डिडरोट इफेक्ट-म्हणजे गाडी पडून राहायला नको म्हणून उगाचच वापर करायचा).

२) गाडीचं मूल्य रोज कमीच होणार (डेप्रीशिएटिंग ॲसेट).

३) गाडीचा मेंटेनन्स व पेट्रोल खर्च निराळा.

४) गाडीची गरज ही सध्याच्या गाडीद्वारे देखील भागवता येऊ शकते.

आणि मग माझ्या मताला पुष्टी देण्यासाठी -गुंतवणूक गुरू, वॉरेन बफे हे अजून त्यांची जुनीच कॅडिलॅक गाडी वापरतात, हे लक्षात आलं.

त्यामुळे माझी नवीन गाडी अगदी १० हजारांत चकाचक करून घेतली आणि ग्रीन टॅक्स मिळून अजून काही हजार मोजून पुढील ४-५ वर्षांसाठी गाडी तयार झाली. त्यामुळे पुढील ४-५ वर्षांसाठी निव्वळ गुंतवणूक ५० हजारांच्या आतच जी नवीन गाडीसाठी कमीत कमी ६-७ लाखांवर गेली असती आणि त्यावरील व्याज धरून १०च्या आसपास. असो, अशाच प्रकारे आपल्या जीवनात डिडरोट इफेक्ट टाळण्यासाठी अजून काही महत्त्वाच्या गोष्टी-

१. डिडरोट टाळण्यासाठी तो होत आहे का ते तपासा.

२. भावनांवर ताबा ठेवा.

३. गरज नसलेल्या चैनीच्या गोष्टींना नाही म्हणायला आणि समजवायला शिका.

४. खुळखुळता जास्तीचा पैसा सर्वांत आधी गुंतवा, खर्च झाल्यानंतर उरलेला पैसा नको.

५. स्वतःला आठवण करून द्या की संपत्ती तुमची अथवा तुमच्या यशाची व्याख्या करत नाही आणि जीवनाची विपुलता आपल्या मालकीच्या वस्तूंमध्ये आढळत नाही.

६. कोणतीही गोष्ट तिच्या उपयोगीतेसाठी योग्य मूल्यामध्ये खरेदी करा, ना की दिखाव्यासाठी.

# सहाव्या दिवशीही एसटी आंदोलनाची धार तीव्र

## कर्जत आगारात कर्मचाऱ्यांचे कुटुंबीय आंदोलनात

**कर्जत : बातमीदार**

राज्य परिवहन महामंडळाचे राज्य सरकारमध्ये विलीनीकरण व्हावे आणि थकीत अनुदान, भत्ते याबाबत एसटी कामगार संघटना यांनी काम बंद आंदोलन केले आहे. कर्जत एसटी आगारातून मागील सहा दिवसात एकही एसटी गाडी बाहेर पडू शकली नाही. सर्व कामगार संघटनेच्या सदस्यांनी कामबंद आंदोलन केले. सहाव्या दिवशी शनिवारी (दि. १३) कामगारांना पाठिंबा देण्यासाठी सर्व कामगारांचे कुटुंबीय आंदोलनात सहभागी झाले. यात महिला, विद्यार्थी यांची उपस्थिती लक्षणीय आहे.



कर्जत तालुका एसटी आगार सोमवारपासून प्रवासी वाहतुकीसाठी बंद आहे. राज्य परिवहन महामंडळाचे राज्य सरकारमध्ये विलीनीकरण व्हावे आणि प्रलंबित मागण्यांसाठी कामगारांनी कामबंद आंदोलन सुरू केले आहे. कर्जत एसटी आगारातील सर्व चार कामगार संघटना या आंदोलनात सहभागी झाल्या असल्याने सोमवारपासून एकही एसटी प्रवाशांच्या सेवेत निघाली नाही. त्यामुळे प्रवाशांचे हाल होत असून आपल्या मागण्या सरकारने मान्य कराव्यात यासाठी कामगार आंदोलनावर ठाम आहेत. दोन दिवस कर्जत आगारातील कामगार मुंबई येथील आझाद मैदानात सुरू असलेल्या आंदोलनात सहभागी झाले होते, मात्र सरकारकडून मागण्या मान्य होत नसल्याने कामगारांनी आंदोलन आणखी तीव्र केले आहे. शनिवारी कर्जत एसटी आगारात कामबंद आंदोलन करणाऱ्या ९३ कामगारांच्या पाठीशी त्या कामगारांचे कुटुंबीय समर्थन देण्यासाठी उतरले. कर्जतमध्ये निवासी असलेल्या कामगारांचे कुटुंबीय हे आज सकाळपासून आंदोलनात सहभागी झाले आहेत. त्यात महिला आणि विद्यार्थी यांचा समावेश असून सर्व कामगारांचे कुटुंबीय आंदोलन असेच सुरू राहिल्यास धडक आंदोलन करणार आहेत. एसटी कामगारांच्या आंदोलनाला कर्जत तालुक्यातील राजकीय पक्षांनी पाठिंबा दिला आहे. त्यात पहिल्या दिवसापासून भाजप आणि वंचित बहुजन आघाडी यांनी आंदोलनाला पाठिंबा दिला आहे.

## रोहा आगारातील आंदोलनाला भाजपचा पाठिंबा

**धाटाव : प्रतिनिधी**

राज्य शासनाच्या सेवेत त्वरित समाविष्ट करावे या प्रमुख मागणीसाठी राज्यातील जवळजवळ ९८ हजार कर्मचारी संपावर गेले आहेत. सलग सहाव्या दिवशी एसटी कर्मचाऱ्यांचा संप हा सुरूच आहे. आम्ही एसटी कर्मचाऱ्यांच्या सोबत आहोत. त्यांच्या आंदोलनाला भाजप पाठिंबा देत आहे. त्याचबरोबर आम्ही त्यांच्या कुटुंबासोबत आहोत. त्यांच्या लढ्यात शेवटपर्यंत साथ देऊच, परंतु जोपर्यंत राज्य सरकार विलिनीकरण करून घेत नाही तोपर्यंत आम्ही शांत बसणार नाही, अशा तीव्र शब्दांत दक्षिण रायगड भाजयुमोचे जिल्हा अध्यक्ष अमित घाग यांनी इशारा दिला.

दरम्यान, रोहा आगारातील पाच कर्मचारी निलंबित करण्यात आलेले आहेत. यामध्ये सुरेंद्र येरुंकनर, विवेक मुंडे, राकेश बामुगडे, आचल जाधव, आशिष भावसार या कर्मचाऱ्यांना निलंबित करण्यात आले असून त्यांचे सलग सहाव्या दिवशी शुक्रवारी आंदोलन सुरूच आहे. मेलात तरी चालेल पण गांडुळाची अवलाद बनू नका, असे बाळासाहेबांनी आम्हाला शिकवले आहे. राज्य सरकार विरुद्ध किंवा कोर्टाच्या विरुद्ध आम्ही काही बोललो तर तो अवमान ठरेल. आम्ही सरकारच्या कोणत्याही आमिषाला बळी पडणार नाही आणि जर पडलो तर या आमच्या तालुक्यात, शहरात, गावात आम्हाला कोणी मान देणार नाही. त्यामुळे आम्हाला शासनाने शासन सेवेत त्वरित समाविष्ट करून घ्यावे, असे निलंबित कर्मचारी सुरेंद्र येरुणकर यांनी सर्व आंदोलकांच्या वतीने सांगितले.




## खालापूर नगरपंचायतीवर महिलाराज

**खालापूर : प्रतिनिधी**

सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार ५० टक्के आरक्षण नियमानुसार खालापूर नगरपंचायत आरक्षण सोडत दुसऱ्यांदा काढण्याची वेळ आली. नव्याने काढलेल्या आरक्षण सोडतीमध्ये नागरिकांचा मागास प्रवर्गासाठी केवळ एक प्रभाग आरक्षित झाला आहे.

नगरपंचायतीला जानेवारीत पाच वर्ष पूर्ण झाली. कोरोना संसर्गामुळे निवडणूक रखडली आहे. गेल्या वर्षी नोव्हेंबर महिन्यात आरक्षण सोडत काढण्यात आली होती, परंतु लोकसंख्येच्या प्रमाणात नागरिकांचा मागास प्रवर्ग आणि सर्वसाधारण महिला आरक्षण ५० टक्के मर्यादेपेक्षा जास्त झाले होते. त्यामुळे नव्याने सोडत काढण्यात आली. शुक्रवारी (दि. १२) खालापूर येथील सरनोबत नेताजी पालकर सभागृहात आरक्षण सोडत झाली. खालापूर २०२१मध्ये सार्वत्रिक निवडणुकीकरिता उपविभागीय अधिकारी अजित नैराळे, खालापूर नगरपंचायत मुख्याधिकारी रश्मी चव्हाण आणि खालापूर नगरपंचायत हद्दीतील नागरिकांच्या उपस्थितीत आरक्षण सोडत काढण्यात आली.

नगरपंचायतीचे १७ प्रभाग आहेत. १७ पैकी २ प्रभाग अनुसूचित जाती, ५ प्रभाग अनुसूचित जमाती, १ प्रभाग नागरिकांचा मागास प्रवर्गासाठी अशी आरक्षण रचना करण्यात आली आहे. अनुसूचित जातीच्या दोन पैकी एक जागा महिलेसाठी राखीव ठेवण्यात आली आहे. अनुसूचित जमातीच्या पाच पैकी महिलांसाठी तीन जागा राखीव आहेत.नागरिकांचा मागास प्रवर्ग खुला आहे. तर सर्वसाधारण नऊ पैकी पाच जागा महिलांसाठी राखीव झाल्याने १७ पैकी नऊ नगरसेविका महिला असून महिलाराज पुन्हा अवतरणार आहे.

## खालापुरात कंपनीला भीषण आग, मोठ्या प्रमाणात नुकसान

**खालापूर, खोपोली : प्रतिनिधी**

खालापुरातील खोपोली-पाली मार्गावर उंबरे गावच्या हद्दीत असलेल्या ब्राईट ईव्हरमेंट सोल्युशन कंपनीला लागलेल्या आगीत गोडाऊन पूर्णपणे जळून खाक झाले असून प्लँटचेही मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.



या कंपनीच्या आवारातच कामगार राहत असल्याने आगीचे प्रमाण पाहता लवकरात लवकर आग आटोक्यात आणणे गरजेचे होते. खोपोली फायर ब्रिगेड टीम, प्रसोल केमिकल फायर ब्रिगेड टीम, गोदरेज कंपनीच्या फायर फायटिंग टीमने पाच तासांच्या अथक प्रयत्नांनंतर आगीवर नियंत्रण मिळविले. तरी गोडाऊनला लागलेली आग मात्र धुमसत आहे. प्लास्टीकवर प्रक्रीया उद्योग असल्याने मोठ्या प्रमाणात आग पसरली.

कपंनीच्या जवळून गेल इंडियाची पाइपलाइन जात असल्याने गेल इंडियाच्या फायर फायटिंग टीमसह खालापूर पोलीसही घटनास्थळी उपस्थित होते. अपघातग्रस्तांच्या मदतीसाठी सस्थेंच्या टीमचे सदस्य असलेल्या केमिकल एक्स्पर्ट धनजंय गीध सह गुरुनाथ साठीलकर, विजय भोसले, अमित गुजरे, अंकित साखरे, शैलेश आबंवणे, यतिन दळवी, तसेच अन्य सामाजिक कार्यकर्त्यांनी मोलाची मदत केली.

**सावधान नोटीस**

आमचे अशील श्री. विक्रम बंडोपंत मोहिते रा. नेरुळ, नवी मुंबई व श्री. अविनाश अशोक कोंडे रा. करंजाडे ता.पनवेल यांनी दिलेल्या माहितीवरून व त्यांचे सांगणेवरून मी ॲड.संतोष बाबुराव भगत तमाम जनतेस या सावधान नोटीसद्वारे सावध करितो कि,

आमचे अशील यांनी श्री. संतोष पदु काथारा व इतर राहणार मौजे- नेवाळी, तालुका-पनवेल, जि.रायगड यांचे मालकीहक्कातील व ताबेकब्जात असलेल्या जमीन मिळकतचे बाबत दिनांक २० मे २०२१ रोजी जमीन विक्रीचा समजोता करार केला आहे. सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे:-

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे-नेवाळी, ता. पनवेल, जि. रायगड**

| अ. क्र. | सर्वे नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकारणी (रु. पै.) | वर्ग |
|---|---|---|---|---|
| १ | १२/६ | ००.०१.०० | ००.०३ | १ |
| २ | १७/२ | ००.०१.८०<br>पो.ख. ००.००.२० | ००.०६ | १ |
| ३ | १७/४ | ००.०१.७०<br>पो.ख. ००.००.९० | ००.०६ | १ |
| ४ | ४/अ/५ | ००.०१.२०<br>पो.ख. ००.०१.८० | ००.१९ | १ |
| ५ | ४०/७ | ००.०२.८० | ००.२८ | १ |
| ६ | ८/६ | ००.०२.८०<br>पो.ख. ००.०२.३० | ००.४४ | १ |
| ७ | १८/१३ | ००.१८.३०<br>पो.ख. ००.०१.३० | २.८१ | १ |
| ८ | २२/५१ | ००.१४.००<br>पो.ख. ००.०२.०० | ००.४१ | १ |
| ९ | २६/७ | ००.०८.८०<br>पो.ख. ००.००.८० | १.६९ | १ |

अश्या प्रकारे आमचे अशील यांचे सदर जमीन मिळकतीमध्ये हक्क व हितसंबंध निर्माण झालेले आहेत व ते अबाधित आहेत. आमचे अशील यांनी सदर जमिनीचे बाबत ठरलेल्या व्यवहाराप्रमाणे उर्वरित रक्कम देण्यासही तयार आहेत परंतु, आमचे अशील याना असे समजले आहे कि सदर जमीन मालक श्री. संतोष पदु काथारा व इतर हे अधिक लाभाच्या हेतूने सदर जमीन मिळकत हि इतर त्र्ययस्थ व्यक्तीच्या लाभात विक्रीकरण्याच्या प्रयत्नात आहेत.

वरील घडामोडीचा अनुषंगाने आमचे अशील हे त्यांचा हक्क व हितसंबंध प्रस्थापित होण्याकरिता व स्वतःची फसवणूक टाळण्याकरिता योग्य ती दिवाणी तसेच फौजदारी कारवाई करतील परंतु यापुढे इतर कोणाचीही फसवणूक होऊ नये या अनुषंगाने तमाम जनतेस सावध करतात कि सदर उल्लेखित जमीन मिळकतीबाबत इतर कोणत्याही त्रयस्थ व्यक्तीने सदर जमीन मालक श्री.संतोष पदु काथारा व इतर यांच्याशी खरेदी विक्री, गहाण, बक्षीसदान, बोजा, साठेकरार, विकसनकरार तसेच हक्कसोडपत्र किंवा इतर कोणताही व्यवहार करू नये याउपरही कोणत्याही व्यक्तीने कोणताही बेकायदेशीर व्यवहार केल्यास त्यामुळे होण्याऱ्या नुकसानीस आमचे अशील जबाबदार असणार नाहीत त्यासंबंधित व्यवहार करणाऱ्या व्यक्तीवर देखील नाइलाजस्तव दिवाणी तसेच फौजदारी कारवाई करावी लागेल. व त्यासंबंधी होणाऱ्या खर्चाची व परिणामांची जबाबदारी हिसंबंधित व्यक्ती यांचेवर राहील याची स्पष्ट नोंद घ्यावी म्हणून जाहीर सावधान नोटीस देत आहोत.

ठिकाण : पनवेल.
दिनांक : १४.११.२०२१

सही/-
**ॲड. संतोष बाबुराव भगत**
पत्ता- शॉप नं- १८, इंद्राआंगण सोसायटी, सेक्टर- ९, प्लॉट नं- २, खांदाकॉलनी, पनवेल, रायगड- ४१०२०६.

## मुरूडमध्ये भात हमीभाव केंद्र सुरू करा

**शेतकऱ्यांची मागणी**

**मुरुड : प्रतिनिधी**

गेल्या वर्षीप्रमाणे याही वर्षी लवकरात लवकर भात हमी भाव केंद्र सुरू व्हावे, अशी मागणी पंचक्रोशीतील शेतकरी वर्गाकडून होत आहे. मुरूड तालुक्यातील खारअंबोली येथे भात हमीभाव खरेदी केंद्र गेल्या वर्षापासून सुरू झाल्यामुळे ३६ गावांतील शेतकऱ्यांची गैरसोय दूर झाली आहे. नडलेल्या शेतकऱ्यांकडून भाताची खरेदी खाजगी व्यापारी अतिशय कमी भावात करून होणारी पिळवणूक थांबली.

महाराष्ट्र स्टेट को-ऑप. मार्केटिंग फेडरेशनतर्फे साधारण भाताची खरेदी प्रतिक्किंटल १८६८ रुपये, तर ए ग्रेड भाताला १८८८ रुपये इतका हमीभाव शासनाकडून जाहीर करण्यात आला असून शेतकऱ्यांच्या बँक खात्यात थेट पैसे जमा होत आहेत. उल्लेखनीय बाब अशी की, राज्य शासनाने भात खरेदीवर प्रतिक्विंटल रुपये ७०० इतका बोनस देखील शेतकऱ्यांना देऊ केल्यामुळे भातशेतीकडे शेतकरी पुन्हा वळू लागल्याचे सकारात्मक चित्र दिसत आहे. केंद्र शासनातर्फे या वर्षी प्रोत्साहन म्हणून ९० रुपये प्रतिक्विंटल अधिक वाढवून मिळणार असल्याचे खात्रीलायक समजते.

> *गेल्या वर्षी १० हजार टन भात हमीभाव खरेदी केंद्रामार्फत खरेदी करण्यात आला. कुठल्याही शेतकऱ्याची तक्रार नव्हती. शिवाय पणन अधिकारी रायगड यांचे उत्तम सहकार्य लाभत असून शेतकऱ्यांना योग्य वेळी भाताचे चुकारे होण्यास मदत झाली आहे. महत्त्वाचे म्हणजे पणन विभागाकडून बारदानही पुरविले जाते. एरवी ३५ ते ३६ किलो भात मावत असलेल्या गोणीसाठी २० रुपये आकारले जातात.*
>
> *-दिनेश मिणमिने, संचालक, अदिती ॲग्रो कंपनी*

## शिक्षक संघटनेकडून गरजू मुलांना खाऊ आणि कपड्यांचे वाटप

**कर्जत : बातमीदार**

रायगडभूषण आणि नेरळ येथील हुतात्मा स्मारक समितीचे अध्यक्ष संतोष पेरणे यांच्या वाढदिवसानिमित्त आदिवासी क्षेत्रात काम करणाऱ्या शिक्षक संघटनांकडून दोन आदिवासी शाळांमध्ये विद्यार्थ्यांना खाऊ आणि कपडे वाटप करण्यात आले.

शिक्षक संघटनेचे पदाधिकारी आणि राज्य शिक्षक पुरस्कार विजेते रवी काजळे यांनी आपले सहकारी शरद नागरटिळक, लहू शिनारे, कवी पारधी यांच्या माध्यमातून धसई येथील वाघ्याचीवाडी आणि वारे केंद्रातील वाघेवाडी या जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना खाऊ आणि कपडे यांचे वाटप केले. या वेळी संतोष पेरणे यांचा वाढदिवस दोन्ही शाळांमध्ये विद्यार्थ्यांसह केक कापून साजरा करण्यात आला.



## ‘कमळ’चा ग्राहक दिन साजरा

**अलिबाग : प्रतिनिधी**

कमळ नागरी सहकारी पतसंस्था मर्या., अलिबाग या संस्थेच्या वतीने नुकताच ग्राहक दिन साजरा करण्यात आला.

संस्थेचे कामकाज १३ शाखांमार्फत चालते, संस्थेच्या सर्व शाखांमधून येणाऱ्या ग्राहकांसोबत हितगुज करावे, त्यांना संस्थेकडून भविष्यात हव्या असणाऱ्या वा अपेक्षित असणाऱ्या सेवा याबाबत चर्चा व्हावी हाच हेतू ठेवून संस्थेने गुरुवारी (दि. ११) हा दिवस ग्राहक दिन म्हणून साजरा केला.

संस्थेचे संस्थापक अध्यक्ष गिरीश विष्णू तुळपुळे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधत हा दिवस ग्राहक दिन म्हणून साजरा करण्याचा निर्णय घेतला आहे. या वेळी संस्थेचे सभासद, संचालक, पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कमळ नागरी सहकारी पतसंस्था मर्या., अलिबाग ही रायगडातील अग्रगण्य पतसंस्था म्हणून सर्वज्ञात आहे. ३९२ कोटी रुपयांचा एकत्रित व्यवसाय असणारी कोकणातील संस्था आहे. संस्थेने विविध उपक्रमातून खूप मोठा ग्राहक वर्ग आपल्या व्यवसायामध्ये सहभागी करून घेतला आहे. या उपक्रमाला संस्थेच्या ग्राहकांनी मोठा प्रतिसाद देत संस्थेच्या कामकाजाबद्दल चांगल्या प्रतिक्रिया व्यक्त करून शुभेच्छा दिल्या.

काही ग्राहकांनी आपल्या लिखित प्रतिक्रिया देऊन काही सूचनाही संस्थेस दिल्या आहेत. दि. ११ नोव्हेंबर हा सासवणे शाखेचा वर्धापन दिवस आहे, याचे औचित्य साधुन सासवने, आवास परिसरातील सभासद, ग्राहक यांना वाचनालयाची सुविधा प्राप्त व्हावी या उद्देशाने वाचनालयाचे ही उद्घाटन करण्यात आले. या वेळी संस्थेचे सभासद उपस्थित होते, त्यांनी या उपक्रमाबद्दल व्यवस्थापनाचे आभार मानले.

**जाहीर नोटीस**

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यांत येत आहे की, आमचे अशिल हे खालील परिशिष्टात वर्णन केलेली जमीन मिळकत ही सदर मिळकतीचे मूळ मालक **१. श्री. जगदीश रामचंद्र पगडे, २. श्री. मुरलीधर रामचंद्र पगडे, ३. श्री. जयंत रामचंद्र पगडे, ४. श्री. दिनेश रामचंद्र पगडे, ५. श्रीमती. चंद्रिका भरत शिवकर.** सर्व रा. तक्का, नवीन पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड यांच्याकडून कायमस्वरुपी नोंदणीकृत खरेदीखताने विकत घेण्याचे ठरविले आहे. सदर जमीन मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे - पाली देवद, ता. पनवेल, जि.रायगड**

| स.नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रू.पैसे | मालकांचे नाव |
|---|---|---|---|---|
| २५ | १ | ०.२४.८०<br>एकूण ०.२४.८०<br>खरेदी क्षेत्र | २.७५ | १. श्री. जगदीश रामचंद्र पगडे<br>२. श्री. मुरलीधर रामचंद्र पगडे<br>३. श्री. जयंत रामचंद्र पगडे<br>४. श्री. दिनेश रामचंद्र पगडे<br>५. श्रीमती. चंद्रिका भरत शिवकर |

वरील वर्णन केलेली जमीन मिळकत अथवा तिच्या कोणत्याही भागावर यापूर्वी विक्री, देणगी, मक्ता, वहिवाट, ताबा, देखभाल, गहाण, कुळ इत्यादी कोणताही हक्क असलेल्या सर्व संबंधितांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या आत आपल्या लेखी हरकती कागदोपत्रांसहीत व पुराव्यासहित खाली सही करणारे यांचेकडे त्यांच्या खाली दिलेल्या पत्त्यावर पोहोचवावी अथवा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्या. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आम्ही सदर मिळकतीचा व्यवहार पूर्ण करू व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचेवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरले जाईल याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

**पनवेल.**
**दिनांक :- १३/११/२०२१**

सही/-
**ॲड. भुषण मोरेश्वर म्हात्रे**

पत्ता : १४६, पहिला मजला, नगरपालिका कॉम्प्लेक्स, भाजीमार्केट जवळ, पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड ४१०२१७. मो. ९८९२२२२२५७

## बोंबल्या विठोबाची यात्रा रद्द

**खोपोली : प्रतिनिधी**

शेकडो वर्षाची परंपरा असलेल्या धाकटी पंढरी, साजगाव यात्रा करोनाचे सावट असल्याने रद्द करण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला. त्यामुळे भाविकांमध्ये नाराजीचा सूर उमटत आहे. कार्तिकी एकादशीपासून सलग १५ दिवस या ठिकाणी यात्रा भरत असते. त्यामुळे भाविकांची प्रचंड गर्दी होत असते.

करोडो रुपयांची उलाढाल या १५ दिवसांत होत असते. या यात्रेमुळे स्थानिक व्यापाऱ्यांना चांगले दिवस येतात. मात्र आता करोनाच्या संकटामुळे ही यात्रा रद्द होत असल्याने, सर्व स्तरात नाराजीचा सूर उमटत आहे. सोमवारपासून कार्तिक एकादशीनिमित्ताने भाविकांसाठी मंदिर खुले राहणार असून, केवळ धार्मिक विधी या काळात होणार आहेत. पूजेच्या साहित्याव्यतिरिक्त इतर दुकानांवर बंदी असल्याचे पोलीस प्रशासन, देवस्थान कमिटी व नगर परिषदेच्या वतीने माध्यमांना सांगण्यात आले आहे.

## शशिकांत पाटणकर यांना साहित्यभूषण पुरस्कार

**पोयनाड : रामप्रहर वृत्त**

बदलापूर येथील सामाजिक कार्यकर्ते आणि कवी शशिकांत अच्युत पाटणकर यांना साहित्यभूषण पुरस्काराने नुकतेच सन्मानित करण्यात आले. पोयनाड येथील संपर्क बालग्राम अनाथाश्रम येथे साहित्यसंपदा समूहाचा तृतीय वर्धापन दिन साजरा करण्यात आला. या वेळी हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.




या वेळी साहित्यसंपदा समूहाचे संस्थापक वैभव धनावडे, प्रमुख पाहुणे ज्येष्ठ गजलकार अे. के. शेख, माजी मुख्याध्यापक श्रीराम लोहकरे, साहित्यिक कवी रमेश धनावडे, तेजस्विनी फाउंडेशनच्या जीविता पाटील, सामाजिक कार्यकर्ते आणि लेखक किरण बोरकर, गजलकार रवींद्र सोनावणे, पाटणकर यांच्या कन्या गजलकार स्मिता हर्डीकर आणि जावई अमित हर्डीकर आदी उपस्थित होते. यापुढेही मराठी भाषेची सेवा, ज्ञानदानाचे कार्य आणि सामाजिक कार्य हातून अविरत घडत राहावे, अशा शुभेच्छा पुरस्कारप्राप्त शशिकांत पाटणकर यांना उपस्थितांनी दिल्या.

# ऑस्ट्रेलिया आणि न्यूझीलंड यांच्यात आज अंतिम लढत

**दुबई : वृत्तसंस्था**

टी-२० विश्वचषक स्पर्धेत रविवारी (दि. १४) ऑस्ट्रेलिया आणि न्यूझीलंड यांच्यामध्ये अंतिम लढत रंगणार आहे. हा सामना दुबई येथील स्टेडियमवर खेळला जाईल. यानिमित्ताने या स्पर्धेला यंदा नवा विश्वविजेता मिळणार आहे. न्यूझीलंड आणि ऑस्ट्रेलिया हे दोन्हीही संघ तुल्यबळ आहेत. उपांत्य फेरीत न्यूझीलंडने इंग्लंडला, तर ऑस्ट्रेलियाने पाकिस्तानला मात देऊन अंतिम फेरीत प्रवेश केलेला आहे.



त्यामुळे अंतिम लढत चुरशीची होईल, अशी चिन्हे आहेत. या स्पर्धेच्या दोन्ही उपांत्य फेरीत संघांना विजयासाठी शेवटच्या पाच षटकांत ६०हून अधिक धावा करायच्या होत्या, पण न्यूझीलंड आणि ऑस्ट्रेलिया या दोन्ही संघांनी एक षटक आधीच लक्ष्य गाठले. आश्चर्याची गोष्ट म्हणजे शेवटची दोन षटके बाकी असताना दोन्ही संघांना उपांत्य फेरीत पोहोचण्यासाठी २२ धावा हव्या होत्या. तरीही सामना १९व्या षटकातच संपला. आता उभय संघांना पहिल्यांदा टी-२० विश्वचषक जिंकण्याची समान संधी आहे. यामध्ये जर न्यूझीलंडचा संघ विजेता ठरला, तर एकाच वर्षात दोन आयसीसी विजेतेपदे जिंकणारा तो पहिला संघ ठरेल.

# विराटचे वन डे कर्णधारपदही जाणार?

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

टीम इंडियाच्या टी-२० संघाचे कर्णधार रोहित शर्माकडे सोपवल्यानंतर भारतीय क्रिकेट नियामक मंडळाचे (बीसीसीआय) वरिष्ठ अधिकारी आता विराट कोहलीसोबत एकदिवसीय संघाच्या नेतृत्वासंबंधी चर्चा करणार असल्याची माहिती आहे. सूत्रांच्या हवाल्याने दिलेल्या वृत्तानुसार बीसीसीआय कोहलीला एकदिवस संघाच्या कर्णधारपदावरूनही हटवण्याची शक्यता आहे.

विराट कोहलीवर कर्णधारपदाची जबाबदारी असल्याने त्याच्यावर दबाव असून त्याने पूर्वीच्या फॉर्मात यावे यासाठी बीसीसीआय हा निर्णय घेऊ शकते. दक्षिण आफ्रिकेविरोधातील मालिकेनंतर एकदिवस संघाच्या नेतृत्वात बदल केले जाऊ शकतात. ११ जानेवारी २०२२पासून ही मालिका सुरू होणार आहे. टी-२०प्रमाणे एकदिवसीय संघाचे नेतृत्वही रोहित शर्माकडे सोपवले जाण्याची शक्यता आहे, तर के. एल. राहुलला उपकर्णधार केले जाऊ शकते.

दरम्यान, भारतीय किकेट संघाचे प्रशिक्षक रवी शास्त्री यांनी विराट कोहली हा टी-२०नंतर आता कसोटी आणि एकदिवसीय कर्णधारपद सोडू शकतो, असे म्हटले आहे.



### टी-२० वर्ल्डकपमध्ये निराशा

विराट कोहलीच्या नेतृत्वात टी-२० वर्ल्डकपसाठी खेळणाऱ्या भारतीय संघाने चाहत्यांची मोठी निराशा केली आहे. पहिल्याच दोन सामन्यांमध्ये पाकिस्तान आणि न्यूझीलंडकडून झालेल्या पराभवामुळे भारत उपांत्य फेरीदेखील गाठू शकला नाही. विराटच्या नेतृत्वात भारताने २०१७ आयसीसी चॅम्पियन्स ट्रॉफी आणि २०१९ वर्ल्डकपची उपांत्य फेरी गाठली होती, पण कर्णधार म्हणून कोणतीही मोठी स्पर्धा तो जिंकू शकलेला नाही.

# रायगड प्रीमियर लीगचे आज अलिबागेत उद्घाटन

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड प्रीमियर लीग क्रिकेट समिती आयोजित २५ वर्षाखालील मुलांची टी-२० क्रिकेट स्पर्धा १५ नोव्हेंबरपासून जेएनपीटी क्रिकेट मैदान आणि रसायनी-मोहोपाडा येथील एनआयएसएमच्या क्रिकेट मैदानावर सुरू होत आहे. तत्पूर्वी या स्पर्धेचे उद्घाटन रविवारी (दि. १४) अलिबागच्या कुरूळ येथील क्षेत्रिय समाज हॉलमध्ये रंगारंग कार्यक्रमाच्या माध्यमातून होणार आहे.

या उद्घाटन समारंभास राजकीय नेते, क्रीडा पदाधिकारी यांच्यासह रायगड जिल्ह्यातील क्रिकेटशी संबंधित मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

स्पर्धेत जिल्ह्यातील आठ संघ सहभागी झाले आहेत. साखळी स्वरूपात खेळल्या जाणाऱ्या या स्पर्धेची उत्सुकता सर्व खेळाडूंना आणि क्रिकेटरसिकांना लागून राहिली आहे.

जिल्ह्यात सध्या लीग स्पर्धा मोठ्या प्रमाणात होत असून त्यामधून स्थानिक खेळाडूंना आपले क्रीडा कौशल्य दाखविण्याची संधी मिळत आहे.

## आरोग्य प्रहर

# हिवाळ्यात फळे खाऊन आजारांना ठेवा दूर

हिवाळा सुरू झाला आहे. या हंगामात फ्लू किंवा इतर संसर्ग झपाट्याने पसरतात. अशा परिस्थितीत शरीर निरोगी ठेवण्यासाठी मजबूत प्रतिकारशक्ती असणे आवश्यक आहे. हिवाळ्यात लोक फळांचे सेवन खूप कमी करतात, ज्यामुळे तुमची प्रतिकारशक्तीदेखील प्रभावित होते. हिवाळ्यात निरोगी राहण्यासाठी तुम्ही या फळांना तुमच्या आहाराचा भाग बनवा.

**सफरचंद** – सफरचंदाचा हंगाम हिवाळ्यात असतो. रोज सफरचंद खाल्ल्याने शरीर आजारांपासून दूर राहते. सफरचंद खाल्ल्याने रोगप्रतिकारक शक्ती मजबूत होते. यामुळे जळजळ होण्याची समस्या कमी होते. सफरचंदांमध्ये भरपूर फायबर, जीवनसत्त्वे सी आणि के असतात.

**डाळिंब** – थंडीच्या दिवसात डाळिंबाचाही हंगाम असतो. तुम्ही रोज एक डाळिंब खाऊ शकता. डाळिंब खाल्ल्याने शरीरातील रक्ताची कमतरता दूर होते. डाळिंब रक्त पातळ करते, ज्यामुळे रक्तदाब, हृदय, वजन कमी आणि त्वचा निरोगी राहण्यास मदत होते.

**पेरू** – पेरूमध्ये व्हिटॅमिन सी आणि अँटी-ऑक्सिडंट घटक आढळतात, ज्यामुळे आपले शरीर कोणत्याही संसर्गाशी लढण्यासाठी तयार होते.

**संत्री** – संत्रा हे व्हिटॅमिन सी आणि कॅल्शियमचा उत्तम स्रोत आहे. हिवाळ्यात उन्हात बसून संत्री खाल्ल्याने शरीर आणि रोगप्रतिकार शक्ती मजबूत होते.

**मोसंबी** – हे व्हिटॅमिन सी समृद्ध असलेले आंबट फळ आहे. तुम्हाला हवे असल्यास तुम्ही त्याचा रस काढून पिऊ शकता. यामध्ये फायबर आणि जीवनसत्त्वे भरपूर प्रमाणात असतात.

**लाल द्राक्ष** – लाल द्राक्षांमध्ये फोलेट, पोटॅशिअम, लोह, कॅल्शियम आणि व्हिटॅमिन्स भरपूर असते. शरीरात ओलावा कायम राहतो.

**अंजीर** – अंजीर पोटॅशियमचा एक उत्तम स्रोत आहे, जो शरीराला रक्तदाब राखण्यासाठी आवश्यक असलेले खनिज आहे.

# पाकविरुद्धचा सामना माझा शेवटचा ठरला असता! -वेड

**दुबई : वृत्तसंस्था**

ट्वेन्टी-२० विश्वचषक स्पर्धेत पाकिस्तानविरुद्ध ऑस्ट्रेलियाच्या उपांत्य फेरीतील विजयाचा यष्टिरक्षक फलंदाज मॅथ्यू वेड शिल्पकार ठरला. वेडने या सामन्यात केवळ १७ चेंडूंमध्ये ४१ धावांची धुवांधार खेळी केली व शेवटी सलग तीन षटकार ठोकत ऑस्ट्रेलियाला दिमाखदारपणे अंतिम फेरीत पोचवले, परंतु या सामन्यापूर्वी आपली ऑस्ट्रेलियन जर्सीमध्ये खेळण्याची ही शेवटची संधी असेल, असे वेडला वाटले होते. याबद्दलचे स्पष्टीकरण स्वतः वेडने सामन्यानंतरच्या पत्रकार परिषदेमध्ये दिले आहे.

'मी सामन्यापूर्वी थोडा घाबरलो होतो आणि मला माहीत होते की, ऑस्ट्रेलियाचे प्रतिनिधित्व करण्याची ही माझी शेवटची संधी आहे. मला फक्त चांगली कामगिरी करायची होती आणि खरोखरच हा सामना जिंकायचा होता, जेणेकरून आम्हाला स्पर्धा जिंकण्याची संधी मिळेल, असे वेडने सांगितले.

# टीकाकारांना शास्त्रींचे सडेतोड उत्तर

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारतीय क्रिकेट संघाचे माजी प्रमुख प्रशिक्षक रवी शास्त्री यांनी टीकाकारांना सडेतोड उत्तर दिलेय. टी-२० विश्वचषकात सुपर १२मधूनच भारत बाहेर पडल्यानंतर भारतीय संघावर जोरदार टीका झाली. यानंतर रवी शास्त्री यांचा प्रशिक्षकपदाचा करारही संपुष्टात आला. या सर्व घडामोडींवरच शास्त्री यांनी भाष्य केले तसेच भारतीय संघाने मागील सात वर्षांत अनेक सामने जिंकले, मात्र एकदा पराभूत झालो तरी लगेच पेन-पिस्तुल बाहेर येतात, असे मत त्यांनी व्यक्त केले.



शास्त्री म्हणाले, माझ्याबाबत माझ्या आयुष्यातील मागील सात वर्षांवरून मते बनवली जात आहेत. या काळात मी सार्वजनिक आयुष्यात असताना माझी चिकित्सा केली गेली. आता मी न्यायाधीशाच्या भूमिकेत जाऊन माझी चिकित्सा करणाऱ्यांवर बोलण्याची वेळ आलीय. भारतात क्रिकेटचे अनेक चाहते आहेत. त्यामुळे पराभवामुळे टीका होणे स्वाभाविक आहे, मात्र कधीकधी भारतीय संघावरील टीका खूप कठोर असते. असे असले तरी ही सर्व टीका मागे टाकून पुढे जाण्याला पर्याय नसतो.

भारतात क्रिकेट हा धर्म आहे. तुम्ही पाच सामने जिंकल्यानंतर हरता तेव्हा पेन आणि पिस्तुल बाहेर येतात. कधीकधी हे फार विषारी असते. अशा वेळी कोणतीही तक्रार न करता ही टीका सहन करावी लागते. आम्ही खूप वेळा जिंकलो. लोकांना आम्हाला पराभूत पाहण्याची सवय नाही. त्यामुळे पराभवानंतर लोकांकडून झाडलेल्या 'गोळ्या' झेलणे हे प्रशिक्षकाचे काम असते, असे शास्त्री यांनी सांगितले. ते रिपब्लिक वर्ल्डशी बोलत होते.

तुम्हाला हे सर्व अडथळे पार करून यावे लागते. तुम्हाला यामुळे खचून चालत नाही. तुम्हाला संघ त्यांची सर्वोत्कृष्ट कामगिरी करेल यासाठी प्रयत्न करावे लागतात. या प्रवासात टीका सहन करून पुढे चालत राहावे लागते, असेही शास्त्री यांनी नमूद केले.



**उरण : केंद्रीय बंदरे, नौकानयन आणि जलमार्ग व आयुषमंत्री सर्बानंद सोनोवाल यांनी शनिवारी जेएनपीटी येथे भेट दिली. या वेळी जेएनपीटीचे विश्वस्त आमदार महेश बालदी यांनी त्यांचे शाल व पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. सोबत भाजप तालुका अध्यक्ष व नगरसेवक रवी भोईर, शहर अध्यक्ष व नगरसेवक कौशिक शाह, उपनगराध्यक्ष जयविन कोळी, नगरसेवक राजेश ठाकूर, वाहतूक सेल जिल्हाध्यक्ष सुधीर घरत, उद्योजक राजेंद्र पडते, कामगार नेते सुरेश पाटील आदी.**

# महिला सेलिंगपटू नेत्रा कुमाननला सुवर्णपदक

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारताची महिला सेलिंगपटू नेत्रा कुमानन हिने स्पेनमधील सेलिंग चॅम्पियनशिप जिंकण्याचा पराक्रम करून दाखवला. नेत्राने ग्रॅन कनारिया सेलिंग चॅम्पियनशिपमधील रेसर रेडीयल प्रकारात सुवर्णपदकावर मोहोर उमटवली.

टोकियो ऑलिम्पिकमध्ये प्रवेश मिळवणारी नेत्रा कुमानन ही भारताची पहिलीच महिला सेलिंगपटू ठरली आहे. स्पेनमध्ये आयोजित करण्यात आलेल्या स्पर्धेत तीन देशांतील २० स्पर्धकांनी सहभाग घेतला होता.



नेत्रा कुमानन हिने तीन शर्यतींमध्ये बाजी मारली तसेच अखेरच्या दोन शर्यतींमध्ये तिने अनुक्रमे तिसरा व चौथा क्रमांक पटकावला. याआधी टोकियो ऑलिम्पिकमध्ये नेत्राला आपला ठसा उमटवता आला नव्हता.

# शोएब मलिकचे अभिनेत्रीसोबत फोटोशूट



**लाहोर : वृत्तसंस्था**

सध्या पाकिस्तानात आणि सोशल मीडियावर आयेशा ओमर आणि शोएब मलिकच्या हॉट फोटोशूटची चर्चा सुरु आहे. आयेशा ओमर पाकिस्तानी अभिनेत्री असून पाकिस्तानातील एका स्थानिक मॅगझिनसाठी आयेशा आणि शोएबने फोटोशूट केले आहे. स्विमिंग पूलसह अन्य फोटोमधील दोघांचा लूक आणि जवळीक यामुळे या फोटोशूटची चर्चा सुरू आहे.

शोएब मलिक भारताची स्टार टेनिसपटू सानिया मिर्झाचा पती आहे. गुरुवारी दुबईत झालेल्या टी-२० वर्ल्डकपच्या उपांत्य फेरीच्या सामन्याला सानिया हजर होती. पाकिस्तानी संघाला प्रोत्साहन देताना ती दिसली.


तत्पूर्वी, पाकिस्तानी संघाने स्कॉटलंडवर विजय मिळवल्यानंतर आयेशाने तिच्या इन्स्टाग्राम अकाऊंटवर हे फोटो शेअर केले. आयेशा आणि शोएबने मागच्या महिन्यात हे फोटोशूट केले आहे.

# चला धावूया आरोग्य जागरूकतेसाठी...! कामोठ्यात आज फन रन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

कामोठ्यातील छावा फाऊंडेशनच्या वतीने रविवारी (दि. १४) बालदिनानिमित्त ५ आणि १० किलोमीटर धावण्याच्या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. शारीरिकदृष्ट्या सक्षम समाज निर्माण करणे आणि वंचित मुलांच्या प्रगतीसाठी त्यांना पोषक अन्न व दर्जेदार शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून देण्याच्या ध्येयाने या फन रनचे आयोजन करण्यात आले आहे.

कामोठे सेक्टर ६मधील रामशेठ ठाकूर इंग्लिश मीडियम स्कूलच्या मैदानात सकाळी ६.३० वाजता आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते झेंडा दाखवून या स्पर्धेला सुरुवात होणार असून याच ठिकाणी सकाळी ८.३० वाजता बक्षीस वितरण समारंभ होईल.



स्पर्धा १८ ते ३०, ३० ते ४५, ४५ ते ६० आणि ६० वर्षांपेक्षा जास्त वयोगटातील पुरुष व महिलांसाठी आहे. स्पर्धेत टी-शर्ट, नाश्ता, टाइमिंग चिप, पदक, ई-प्रमाणपत्र आणि विजेत्यांसाठी ट्रॉफी देण्यात येणार आहे. या वेळी सुमारे ५० एचआयव्ही पॉझिटिव्ह बालकांना भेटवस्तू देऊन प्रोत्साहित करण्यात येणार आहे.









**पनवेल : भातकापणी आणि झोडणीची कामे अंतिम टप्प्यात आली आहेत. त्यामुळे बळीराजा आपले कुटुंब तसेच मजुरांसह शेतीकामात गर्क आहे.**
(छाया : लक्ष्मण ठाकूर)

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com